## ५० जणांवर वीज कोसळली

**भुवनेश्वर, दि. ७ प्रतिनिधी**

ओडिशामध्ये एक भयानक घटना घडली आहे. देवगड जिल्ह्यातील रियामल ब्लॉकच्या राजचट गावात वीज कोसळून एका पुजेसाठी जमलेल्यांपैकी ५० हून अधिक भाविक जखमी झाले आहेत. यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. गिरी गोवर्धन पूजेसाठी गावकरी एकत्र आले होते. या जखमींपैकी १२ जणांना छेंडीपाडा सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. तर गंभीर असलेल्या तीन जणांवर कोसला सामुदायिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. येथील चित्रकूट पर्वतावर शंभरहून लोक जमले होते. तेव्हा अचानक दुपारी ४ च्या सुमारात पाऊस आणि गडगडाट सुरु झाला. यावेळी त्यांच्यावर वीज कोसळली. यामुळे अनेक लोक बेशुद्ध पडले. काही वेळाने ज्यांना शुद्ध आली ते कसेबसे त्या डोंगरावरून खाली आहे. परंतू १५ जण तिथेच बेशुद्ध पडलेले होते. गावात समजताच गावात राहिलेले लोक तिकडे धावले. त्यांनी जमखींना खाली आणले व सरकारी रुग्णालयांत दाखल केले.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | सोमवार, ८ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:९६ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


**अग्राग्रलेख**

**खरीखरी**

## उपराष्ट्रपती पदाचे झेंगट

उद्या उपराष्ट्रपती पदाची निवडणूक आहे. जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणामुळे राजीनामा दिल्याचे त्यांनी सांगितले होते. बहुधा त्यांना एखाद्या वैद्याकडून हेमगर्भाची मात्रा मिळाली असावी. त्यामुळे ते अदृश्य असले तरी त्यांच्या तब्येतीची दृश्यपणे तेवढी काळजी करण्यासारखे काहीच दिसत नाही. पण त्यांच्या राजीनाम्यानंतर सर्व राजकारणाचीच तब्येत बिघडलेली दिसते कारण काठावर असलेले बहुमत, चंद्राबाबू आणि त्यांच्या पुत्राची काकदृष्टी, चिराग पासवानांचा रोष यासारख्या अनेक अडथळ्यांपायी सत्तारूढ पक्षाच्या सध्या तरी नाकीनऊ आलेले दिसत आहेत. पक्षाध्यक्ष नड्डा यांची मेजवानी रद्द होणे, त्याबरोबरच पंतप्रधान यांनीही आपल्या ठरवलेल्या शाही पंगतीची रंगत न देणे यामुळे दिल्लीचे राजकीय वातावरण एखाद्या रहस्यपटाप्रमाणे झाले आहे. ईंडिया आघाडीने तेलुगु उमेदवार दिल्याबरोबर आंध्र प्रदेशांमध्ये जे काही प्रेमाचे उमाळे दिसून येत आहेत, त्यामुळे धाकधूक नसेल असे समजण्याचे अजिबात कारण नाही. ईकडे आपल्या पक्षातच काही खासदार नाराज असल्याच्या वातावरणात घुमू लागलेल्या आहेत. सत्तारूढ एनडीएला कोणे एकेकाळी भरभरून मदत करणारे आंध्र प्रदेशचे वायएसआर आणि ओरिसाचे नवीन पटनायक वगैरे सारख्यांची मदत मिळते की नाही याचीही धास्ती आहे. गेल्या दहा ते अकरा वर्षात ज्या वातावरणात जे जे करायचे होते ते केले. आता आपलेच खासदार आपल्याला फसवतात की काय, अशा शंका कुशंका दिल्लीच्या दरबारात रोज घुमत आहेत. आजच्या परिस्थितीत एनडीएकडे निवडून येण्यासाठी जे काही बहुमत आहे ते बऱ्यापैकी आहे हे दिसत असले तरी, दिसते तसे नसते म्हणून जग फसते अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणे आपण फसू नये म्हणून एनडीएला जबरदस्त तयारी करावी लागत आहे. ज्या खासदारांना गेल्या दहा अकरा वर्षात फारशी किंमत मिळत नव्हती आणि ज्या खासदारांमध्ये तोंडातून ब्र काढण्याची हिम्मतही नव्हती. त्यापैकी काही खासदार आपला मुकपणा सोडून आता बोलू लागलेले आहेत, अशा प्रकारे बोलणे आजपर्यंत कोणीही केलेले नव्हते. आता सोमवारची रात्र आणि मंगळवारचा दिवस यशस्वीपणे पार पडला रे पडला की बोलणाऱ्यांना दिवसा तारे दाखवू असे सर्वोच्च नेते म्हणजेच 'त्रिदेव' मनोमन समजत असावेत. कितीही नाही म्हटले तरी ईंडिया आघाडीला विजय मिळेल मिळेलच असे ईंडिया आघाडीलाही अजिबात वाटत नाही, पण आपल्या क्षमतेपेक्षा थोडी मोठी आघाडी घेतली तरी तो विजयाकडे जाणारा मार्ग आहे असे विरोधक विरोधकांना म्हणता येइल. आधी त्या थेरड्या ट्रम्पने मुळातच खुंटी मारून ठेवली आहे, तिकडे बिहारमध्ये पप्पू साहेबांनी पप्पूगिरी सोडून टप्पूगिरी सुरू केल्यामुळे ती एक वेगळीच चिंता लागून राहिलेली आहे. या चिंतेच्या गुंत्यासोबत पंजाब, हिमाचल प्रदेश आणि जम्मू काश्मीर सारख्या राज्यातील निसर्गाच्या अवकृपेचा फटका फारच मोठा आहे. ईतरही अनेक लहान मोठ्या प्रश्नांनी आता डोके वर काढणे सुरू केलेले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर उद्या होणारे मतदान आपल्या पारड्यात कसे पडेल याचे गणित मांडण्याचे काम सुरू झालेले आहे. धनखडांचा राजीनामा एवढा महाग पडेल असे सत्तारूढ पक्षाला स्वप्नातही वाटले नव्हते. आपण त्या धनखडाला खड्यासारखे काढले मात्र, आता आपला खडा निशाण्यावर लागेल की नाही अशी सध्याची परिस्थिती आहे. कधीकाळी हे दिवस येतील अशी कल्पनाही कोणी केली नव्हती पण ती वेळ आता आलेली आहे. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एवढे मोठे झेंगट अशाप्रकारे आपल्या मागे लागेल, याची जागेपणी तर सोडाच, स्वप्नातही कुणीच कल्पना केली नव्हती. सध्या वाट्टेल ते करून निवडणूक जिंकलीच पाहिजे. यासाठी आपले सर्व पहेलवान कामाला लावून यश मिळवणे, हेच आता सत्ताधारी पक्षाचे एकमेव लक्ष्य असेल.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# लालबागचा राजा विसर्जनात भरतीचे विघ्न

**मुंबई, दि. ७ प्रतिनिधी**

**मुंबईतील लालबागचा राजा मंडळाच्या गणपतीच्या मूर्तीला तराफ्यावर विराजमान करण्यात यश आलं आहे. अत्याधुनिक तराफ्यावर लालबागचा राजा विराजमान झाल्यानंतर मंडळाचे सचिव सुधीर साळवी यांनी संवाद साधला. रात्री साडे दहा ते अकरा नंतर विसर्जन होऊ शकतं, अशी माहिती सुधीर साळवी यांनी दिली. लालबागच्या राजावर करोडो भाविकांची श्रद्धा असल्यानं सकाळी एक प्रयत्न केला मात्र तो थांबवल्याचं ते म्हणाले. यावेळी साळवी यांनी माध्यमांचे आभार मानले.**

मुंबईत पडत असलेला पाऊस आणि अरबी समुद्राची भौगौलिक परिस्थिती पाहता यावेळी अरबी समुद्राला भरती लवकर आली. लालबागच्या राजाच्या गणपतीचं विसर्जन भरती आणि ओहोटीवर अवलंबून असते. आम्ही इथं पोहोचायच्या अगोदर भरती आली होती. आम्ही एक प्रयत्न करुन बघितला, लालबागचा राजा करोडो भाविकांचं श्रद्धास्थान आहे त्यामुळं तो प्रयत्न थांबवला, असं सुधीर साळवी म्हणाले. ओहोटीच्या वेळी लालबागचा राजा तराफ्यावर घेतो. भरती आल्यावर तराफा अरबी समुद्रात जातो, त्यावेळी विसर्जन होतो. लालबागचा राजा मंडळाकडून उशिरा झालेल्या विसर्जनामुळं दिलगिरी व्यक्त करतो. मुंबई महापालिका आणि मुंबई पोलिसांचं आभार मानतो. भरती लवकर आली आणि १० ते १५ मिनिटं उशिरा पोहोचलो. माध्यमं आमच्या पाठिशी उभी राहिले त्यामुळं सर्वांचे आभार मानतो, असं सुधीर साळवी म्हणाले.

लालबागचा राजा करोडो भाविकांचं श्रद्धास्थान असल्यानं आम्ही शास्त्रोक्त पद्धतीनं विसर्जन करणार आहोत. आता ही जी भरती आहे ते पाहता आणि कोळी बांधवांशी संवाद साधला, त्यानुसार रात्री साडे दहा ते अकरा वाजता विसर्जनासाठी लालबागचा राजा मार्गक्रमण करेल, असं सुधीर साळवी म्हणाले.

मुंबईत दोन दिवस तुफान पाऊस पडतोय आणि भरती लवकर आली. त्यामुळं विसर्जनाची वेळ जुळली नाही. यामुळं विसर्जन थांबवण्याचा निर्णय घेतला. आज रात्रीपर्यंत विसर्जन पार पाडू, असा शब्द सुधीर साळवी यांनी दिला.

लालबागचा राजा काल म्हणजे शनिवारी सकाळी १० वाजताच्या आसपास विसर्जनासाठी लालबाग येथील मंडपातून बाहेर पडला होता. त्यानंतर तब्बल २० तासांच्या मिरवणुकीनंतर रविवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास लालबागचा राजा गिरगाव चौपाटीवर दाखल झाला. त्यानंतर साधारण दीड-दोन तासात आरती होऊन लालबागच्या राजाचे विसर्जन होईल, अशी अपेक्षा होती.

मात्र, लालबागचा राजा गिरगाव चौपाटीवर पोहोचला नेमक्या त्याचवेळी समुद्राला भरती सुरु झाली. त्यामुळे लालबागचा राजासाठी तयार करण्यात आलेला विशेष तराफा हलू लागला. यावर मूर्ती ठेवणे धोक्याचे होते. त्यामुळे लालबागचा राजा मंडळाने गणपतीची मूर्ती समुद्रात थोड्या आतमध्ये नेऊन गणपतीचे सगळे दागिने काढले. त्यानंतर ज्या ट्रॉलीवरुन गणपती चौपाटीपर्यंत आणला त्यावरुन मूर्ती काढताना अडचण येत होती.



संध्याकाळ होत आली तरी राजाचं विसर्जन झालेलं नाही. बाप्पााच्या विसर्जनात येत असलेली विघ्नं पाहून भक्त कासावीस झाले आहेत. काही चुकलं असेल तर क्षमा मागतो. आमच्या चुका तुझ्या पोटात घे. आम्हाला माफ करा, अशी आर्त विनवणी भाविकांनी सुरू केली. राजाचे विसर्जन खोळंबल्यानंतर नेटकऱ्यांनी लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळाला अक्षरश: धारेवर धरलं आहे. राजाच्या मंडपात, त्याच्या डोळ्यांदेखत त्याच्याच भक्तांना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीकडे अनेकांनी बोट ठेवलं आहे. राजाचं विसर्जन रखडल्यानंतर अनेकांनी याच गोष्टीकडे बोट दाखवलं आहे. 'लोकांना लाथा मारून , एका मुलीच्या बापाला तिच्या समोर मारहाण करणारे कार्यकर्ते शिवीगाळ करणारे कार्यकर्ते असल्यावर कसा राजा जाईल सांगा. सर्व कार्यकर्त्यांनी हात झोडून माफी मागायला पाहिजे. तरच राजा विसर्जनाला जाईल', अशा आशयाच्या प्रतिक्रिया राजाच्या व्हिडीओखाली सोशल मीडियावर पाहायला मिळाल्या.

## गिरगाव चौपाटीवर मुख्यमंत्र्यांचा गणरायाला निरोप

**मुंबई, दि. ७ प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे, त्या उत्सवाचा जल्लोष आज गिरगाव चौपाटीवर उच्चांक गाठताना दिसला. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून गणरायाला निरोप दिला.

राज्य महोत्सवाच्या या उत्साहात गीरगाव चौपाटीवर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमित साटम, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त अमितकुमार सैनी तसेच हजारो भाविक यांची उपस्थिती होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि "गणपती बाप्पा मोरया"च्या गजरात वातावरण भारावून गेले होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईतील गणरायांना निरोप दिला.



गिरगाव चौपाटी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी गणेश मूर्तींवर पुष्पवृष्टी करून

राज्यात दहा दिवसांचा गणेशोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. "लोकांनी हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला. बाप्पाच्या विसर्जनावेळी मनात थोडीशी खंत व दु:ख होते, कारण दहा दिवसांनी बाप्पा आपल्याला सोडून जातात. पण याचबरोबर पुढच्या वर्षी ते परत येणार आहेत याचा आनंदही असतो," असे श्री. फडणवीस म्हणाले.

मुंबई, पुणे तसेच राज्यातील सर्व शहरांमध्ये, गावांमध्ये गणेशोत्सवाच्या मिरवणुका शांततेत व शिस्तीत पार पडल्या. "पोलीस विभाग, महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासन यांनी केलेल्या व्यवस्थेमुळे हा उत्सव सुरळीत पार पडला. त्यांचे काम कौतुकास्पद आहे," असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

गिरगाव चौपाटीवरील विसर्जन सोहळ्याला मुंबईकरांसोबत विविध मान्यवरांचीही उपस्थिती होती. मुंबई महानगरपालिका, पोलिस व स्वयंसेवकांच्या मदतीने विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली.

## पुण्यातही मिरवणूक रेंगाळली

**पुणे, दि. ७ प्रतिनिधी**

पुण्यात गणेशोत्सव मिरवणूक रेंगाळलीच असून सकाळपासून टिळक चौकात पोलिसांकडून मंडळांना वेग वाढवण्याच्या सूचना दिल्या जात



आहेत. लवकर पुढे न गेल्यास कारवाई करणार, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत २०४ मंडळे टिळक चौकातून मार्गस्थ झाली आहेत.


यंदाची गणेश विसर्जन मिरवणूक एक तास आधी सुरू झाली. मानाच्या पाचही गणपतींचे वेळेवर विसर्जन झाले असले तरी नंतर अनेक मंडळांमध्ये अंतर वाढल्यामुळे मिरवणुका रात्री उशिरापर्यंत रेंगाळल्या होत्या. त्यानंतर आजही मिरवणुका सुरूच आहेत. लक्ष्मी रस्त्याचा ३५ वा मंडई गणपती पहाटे चार वाजता टिळक चौकात पोहोचला. म्हणजेच पहिल्या साडेअठरा तासात फक्त ३५ मंडळे लक्ष्मी रस्त्यावरून गेली होती. दुपारी साडेबारा वाजेपर्यंत १७९ मंडळे टिळक चौकातून मार्गस्थ झाली होती.

## संसदेच्या आवारात भाजपची दोन दिवसांची कार्यशाळा; मोदी शेवटच्या रांगेत बसले

**नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था**

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीपूर्वी आज संसदेच्या आवारात भाजपची दोन दिवसांची कार्यशाळा सुरू झाली आहे. या कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी संसदेच्या आवारातून एक फोटो समोर आला आहे, ज्याने सर्वांनाच चकीत केले आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी स्वतः मोदी आले होते, परंतु पुढच्या रांगेऐवजी ते सामान्य कार्यकर्त्यांसारखे सभागृहाच्या शेवटच्या रांगेत बसलेले दिसले.

भाजपच्या राज्यसभा खासदार संगीता बलवंत यांनी सोशल मीडियावर कार्यशाळेचे काही फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये त्या मागच्या रांगेत बसून कार्यशाळेत



सहभागी झाल्याचे दिसत आहे. परंतु त्यांच्यापासून थोड्या अंतरावर पंतप्रधान मोदीदेखील इतर खासदारांसह मागच्या रांगेत बसलेले दिसतात. या फोटोंमध्ये पंतप्रधान मोदी एका सामान्य कार्यकर्त्याप्रमाणे काळजीपूर्वक भाषण ऐकत असल्याचे दिसते. या कार्यशाळेत पंतप्रधान मोदींव्यतिरिक्त अमित शाह, जेपी नड्डा आणि इतर अनेक केंद्रीय मंत्री आणि खासदार सहभागी आहेत.


कार्यशाळेत नवीन जीएसटी स्लॅबच्या घोषणेबद्दल खासदारांकडून पंतप्रधानांचे अभिनंदन केले जाण्याची शक्यता आहे. तसेच, कार्यशाळेत पक्षाचा इतिहास आणि विकास, तसेच खासदारांसाठी कार्यक्षमता वाढवण्यासाठी टिप्स दिल्या जातील. या कार्यशाळेत खासदारांसाठी चार सत्रे असतील, पहिले सत्र आत्मनिर्भर भारत, स्वदेशी भारत, व्यवसाय सुलभता आणि युवा शक्ती आणि रोजगार यावर असेल. दुसरे सत्र खासदारांनी सोशल मीडियाचा प्रभावी वापर कसा करावा यावर असेल. तिसरे सत्र खासदारांच्या स्थायी समितीच्या गटांवरील चर्चेवर असेल. चौथे सत्र सागरी प्रदेश, डाव्या विचारसरणीचा प्रदेश, ग्रामीण भाग, शहरी भाग, डोंगराळ आणि ईशान्य प्रदेश यावरील चर्चेवर आधारित असेल.

# दसरा मेळाव्यात ठाकरे बंधू एकत्र येणार का ?

**मुंबई, दि. ७ प्रतिनिधी**

दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येतील अशी चिन्हं आहेत. या चर्चा सुरु झाल्या कारण सचिन अहिर यांनी एक वक्तव्य केलं होतं. त्यामुळे या चर्चा सुरु झाल्या होत्या. संजय राऊत यांना याबाबत विचारलं असता आता त्यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येणे, ही केवळ दोन पक्षांची गरज नसून ते राज्यासाठी गरजेचे आहे. ही लोकांच्या मनातील भावना आहे. आता गणपती संपल्यानंतर पितृपक्ष सुरु होत आहे. त्यामुळे आता दसऱ्याला चांगली बातमी मिळेल, अशी अपेक्षा आहे. दसरा मेळाव्यात आमचे नेते सध्याची परिस्थिती काय आहे आणि त्याला सामोरे कसे जायचे, याविषयी मार्गदर्शन करतील. दसरा मेळाव्यातून कार्यकर्त्यांना दिशा द्यायची असते. त्यामुळे हा मेळावा राजकीय आणि सामाजिक दृष्टीकोनातून



महत्त्वाचा आहे, असे सचिन अहिर यांनी म्हटले. राज आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही भाऊ हे एकमेकांना कायम बघत असतात. दसरा मेळाव्याला हे दोघे स्टेजवर एकत्र येतील, का माहिती नाही. पण आम्ही त्यांना आमंत्रित करु शकतो, ही शक्यता नाकारता येत नाही. आमच्याप्रमाणे त्यांचाही मेळावा असतो. त्यामुळे तेदेखील आम्हाला आमंत्रित करु शकतात असंही अहिर म्हणाले होते. याबाबत संजय राऊत यांना विचारलं असता त्यांनी एक प्रकारे ही शक्यता फेटाळली आहे.

संजय राऊत म्हणाले की, दसरा मेळाव्यात एकत्र येण्याबाबत मला माहित नाही. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात उत्तम संवाद सुरू आहे हे मी तुम्हाला खात्रीने सांगतो. दसरा मेळावा हा शिवसेनेचा असतो. माझ्या माहितीप्रमाणे राज ठाकरेंचा गुढीपाडव्याला दुसरा वेगळा मेळावा असतो. आमचही विचारसरणी मराठी माणसांसाठी एक आहे. दोन्ही पक्ष वेगळे आहेत. त्यामुळे तसं होणं शक्य नाही. दोन्ही पक्षाचे मेळावे वेगळे होतात. भविष्यामध्ये काम करण्यासाठी एकत्र येऊन आमची सहमती झाली आहे. साठ वर्षापेक्षा जास्त काळ हा फक्त शिवसेनेचाच दसरा मेळावा आहे, असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे दसरा मेळाव्याला राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याची शक्यता संजय राऊत यांनी एका अर्थाने फेटाळली आहे असंच म्हणता येईल.

## मनोज जरांगेंना सरकारचा ड्राफ्ट आधीच माहिती होता

### मराठा समन्वयकाचा गंभीर आरोप

**जालना, दि. ७ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचा प्रश्न अधिक चिघळत असताना, मराठा समन्वयक आणि अभ्यासक डॉ. संजय लाखे पाटील यांनी मनोज जरांगे यांच्यावर सडकून टीका केली आहे. "मराठा आरक्षण हा जगन्नाथाचा रथ आहे, पण जरांगेंना वाटतं की हा रथ मी एकटाच ओढतोय," अशा शब्दांत त्यांनी जरांगे यांच्या नेतृत्वावर



प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. डॉ. संजय लाखे पाटील म्हणाले, "मनोज जरांगे स्वतःचे मत वाढवण्यासाठीच आंदोलन करतात. ते समस्त मराठा समाजाचे नव्हे तर कुणबी समाजाचे नेतृत्व करत आहेत. जरांगेंची एकही मागणी वैद्य, कायदेशीर, घटनात्मक आणि मराठा समाजाला आरक्षण मिळावे या पद्धतीची नाही. त्यांना कायदा आणि शासन आदेश यातला फरकच कळत नाही. समाजाने जरांगेवर केवळ फुलांवर 100 कोटी उधळले, पण चुकीच्या पद्धतीने आंदोलन चालवून मराठा समाजाचे नुकसानच होत आहे."

आरोप करताना लाखे पाटील पुढे म्हणाले, "मनोज जरांगे आंदोलनातून स्वतःची बुवाबाजी चालवतात. त्यांना स्वतः पुढून कॅमेरा जायला नको असं वाटतं. मराठा समाजातील घटनात्मक आवाज आणि अभ्यास असलेल्या लोकांना टार्गेट करण्याचं काम ते सूत्रबद्ध पद्धतीने करतात. मुंबईतील आंदोलनादरम्यान शासनाने दिलेला ड्राफ्ट जरांगेंना आधीच माहीत होता. केवळ सरकारचा जयजयकार करण्यासाठी गुलाल उधळला गेला. आधीच सरकारसोबत ड्राफ्ट तयार करतात आणि मग अभ्यासकांना बोलावून चर्चा करण्याचे नाटक करून समाजाची फसवणूक करतात", असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

आरएसएस अजेंड्याचा उल्लेख करत ते म्हणाले, "जरांगेंचं आंदोलन उभं राहिलं नाही तर त्यांना सपोर्ट मिळणार नाही. अन्यथा देवेंद्र फडणवीस तीन महिने देखील मुख्यमंत्री राहू शकत नाहीत. RSS च्या अजेंड्यानुसार जरांगे मराठा समाजाला इतर समाजापासून वेगळं पाडण्याचं काम करत आहेत. मराठा समाजाची राधाकृष्ण विखे पाटलांनी बेईमानी केली. ही मागणी घटनात्मक, कायदेशीर किंवा वैध नसल्याचेही स्पष्ट आहे."

## ज्यांच्या नोंदी आहेत त्यांनाच कुणबी प्रमाणपत्र मिळणार; फडणवीसांचे ओबीसींना आश्वासन

**पुणे, दि. ७ प्रतिनिधी**

मराठा आरक्षण देताना आम्ही ओबीसींना कोणताही धक्का लावला नाही, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र न देता ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांनाच फक्त आरक्षणाचा लाभ मिळणार आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ओबीसी समाजाच्या विकासासाठी सरकार कटीबद्ध आहे. पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती सोहळा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी देवेंद्र फडणवीसांनी हे वक्तव्य केलं.



मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्र देणार नाही. काहीही झाले तर ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींकरता योजना करणारे हे सरकार आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "आमच्या सरकारची नीती पक्की आहे. एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केलं ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठवाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल असे आपण सांगितले आहे."

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, "ओबीसींना जोपर्यंत मुख्य प्रवाहात आणणार नाही त्यावर त्याचा विकास होणार नाही. ओबीसी विकास होईपर्यंत शिवकार्य पूर्ण होऊ शकत नाही. कोणीही मनात शंका घेऊ नका."

## हा तर मणिपूरच्या लोकांचा अपमान

### मोदींच्या दौऱ्यावर काँग्रेसची टीका

**नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या १३ सप्टेंबर रोजी मणिपूरचा दौरा करणार आहेत. राज्यातील हिंसाचार सुरू झाल्यानंतर पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच दौरा आहे. यावर सर्व राजकीय पक्षांकडून प्रतिक्रिया येत आहेत. काँग्रेसने या दौऱ्यावरुन सरकारवर बोचरी टीका केली. काँग्रेसने म्हटले की, '२९ महिन्यांनंतर पंतप्रधान मणिपूरला जात आहेत, पण फक्त ३ तास तिथे घालवणार! हा मणिपूरच्या लोकांचा अपमान आहे.'

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यावर टीका करताना म्हटले की, '१३ सप्टेंबर रोजी पंतप्रधानांच्या प्रस्तावित मणिपूर दौऱ्याचे त्यांच्या समर्थकांकडून स्वागत केले जात आहे, परंतु ते राज्यात फक्त ३ तास घालवणार आहेत. इतक्या घाईघाईत केलेल्या या दौऱ्यातून काय साध्य होणार आहे? हा राज्यातील लोकांचा अपमान आहे. त्यांनी २९ वेदनादायक महिने पंतप्रधानांची वाट पाहिली आहे. यामुळे मणिपूरच्या लोकांबद्दल त्यांची उदासीनता आणि असंवेदनशीलता दिसून येईल,' अशी बोचरी टीका जयराम रमेश यांनी केली.

काँग्रेस व्यतिरिक्त शिवसेना (उबाठा) नेते खासदार संजय राऊत यांनीदेखील पीएम मोदींच्या दौऱ्यावर टीका केली. ते म्हणाले, 'जर ते मणिपूरला जात असतील, तर त्यात मोठी गोष्ट काय? ते पंतप्रधान आहेत, ते दोन-तीन वर्षांनी तिथे जात आहेत. जेव्हा मणिपूर जळत होते, हिंसाचार भडकला होता, तेव्हा त्यांना जाण्याची हिंमत झाली नाही. आता मोदींनी पंतप्रधानपद सोडण्याची वेळ आली आहे, म्हणून ते पर्यटनासाठी तिथे जात आहेत.'

# कृषी विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा : जिल्हाधिकारी



**नाशिक ।** कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची अंमलबजावणी करतांना वेळ व श्रम वाचविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा जिल्हाधिकारी शर्मा यांनी घेतला. यावेळी विभागीय कृषी सह संचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, आत्मा चे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी शर्मा म्हणाले की, आज सर्व क्षेत्रात ए.आय. प्रणालीचा वापर प्रभावीपणे होतांना दिसून येतो. दैनंदिन काम करतांना कालानुरूप चालत आलेल्या कार्यपद्धतीत बदल करून आपण निश्चितच या प्रणालीचा वापर करून कामाचा निपटरा वेळेत करू शकतो. कांद्याची साठवणूक करण्यासाठी शेतकऱ्यांना कांदाचाळीसाठी अनुदान दिले जाते. कांदा अधिक काळ टिकावा यासाठी कांदाचाळ तयार करण्यात वापरण्यात येणाऱ्या पारंपारीक साधनांमध्ये बदल करून सुरक्षित पद्धतीच्या साधनांच्या निर्मितीसाठी डिझाइन तयार करण्यात यावे. पीकपहाणी व पीक नोंदणी करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग करावा व शेतकऱ्यांना या साधनांच्या वापरासाठी कार्यशाळा आयोजित करण्याच्या सूचना शर्मा यांनी दिल्या. महापालिका क्षेत्रात शेतकरी ते ग्राहक विक्री केंद्र सुरू करण्यासाठी नाशिक महापालिकेतर्फे जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कृषी विभागाने ही विक्री केंद्रे स्थापन करण्यासाठी किमान 10 ठिकाणी जागांची निश्चिती करावी. या केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार असून, त्यांच्या शेतीमालाला रास्त भाव मिळणार आहे. या ठिकाणी स्वच्छता राहील याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. यासोबतच कृषी विभागाने योजनांचे प्रस्ताव वेळेत सादर करावेत, अशा सूचनाही शर्मा यांनी दिल्या. यावेळी कृषी समृद्धी योजना, राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान, प्रधानमंत्री पीक विमा योजना, महावेध प्रकल्प, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, राष्ट्रीय कृषी विकास योजना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना, अटल भूजल योजना, कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान, राष्ट्रीय खाद्यतेल अभियान, पिकांवरील किड रोग सर्व्हेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अशा विविध योजनांचा आढावा शर्मा यांनी घेतला. यावेळी कृषी सह संचालक सुभाष काटकर यांनी कृषी विभागांतर्गत सुरू असलेल्या योजनांची माहिती सादर केली.

## भाजप जिल्हा नूतन पदाधिका-यांचा दिंडोरीत जाहीर सत्कार सोहळा संपन्न



**दिंडोरी ।** भारतीय जनता पक्षाच्या नाशिक दक्षिण जिल्ह्याची सन २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठी जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव यांनी प्रदेश भाजप नेतृत्वाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यकारिणी जाहीर केली असून, नुतन जिल्हा कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांना दिंडोरी मंडळाच्या वतीने, सन्मानित करण्यात आले.

यावेळी नाशिक जिल्हा सरचिटणीस पदी- रणजित देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष- योगेश तिडके, चिटणीस- लक्ष्मण गायकवाड , विधानसभा प्रभारी- चंद्रकांतजी राजे, दिव्यांग आघाडी जिल्हा अध्यक्ष- सुकदेव खुर्दळ, धीरज चव्हाण (भटके विमुक्त), विलास नाना देशमुख (सदस्य), कैलास धात्रक(सदस्य), काकासाहेब वडजे. (सदस्य), डॉ.राजेंद्र वराडे(सदस्य), आशाताई कराटे (सदस्य), प्रज्ञाताई वाघमारे (सदस्य), तुषार वाघमारे (सदस्य), कैलास धात्रक(सदस्य) शिवाजी पिंगळ (सदस्य) आदींना शाल, पुष्प गुच्छ देवून सन्मानित करण्यात आले. त्याच प्रमाणे प्रदेश कार्यकारिणीत सदस्य म्हणून नेमणूक झाल्याने श्याम बोडके यांचाही सत्कार करण्यात आला कार्यक्रम प्रसंगी, तालुकाध्यक्ष श्यामराव मुरकुटे, शहर अध्यक्ष तुषार घोरपडे, अक्लास शेख, गोविंद बोडके, शैलेश धात्रक, अमोल खोडे, दिगंबर ढाकणे, गणेश बुणगे, सिद्धांत विद्याते , राम कराटे, अक्षय नाईकवाडे, मंदा गायकवाड़ संजय कदम, निता भामरे, अश्विनी सोनवणे, मोनिका मांगुर्डे, राणी भोये, संजय बोडके, ज्योती देशमुख, उज्वला धात्रक, कविता साळवे, रिकू गांगुर्डे दिलीप बोरसे, भारती देशमुख, रोहित संभेराव, श्रृषी साबद्रा, हेमंत शेटे संजय, काठे, बबन दोबाडे, धिरज चव्हाण, ह्तिेश, देशमुख बाळासाहेब सोनवणे आदी सह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्ने उपस्थित होते.

## रासबिहारी लिंकरोडवर खड्डयांचे साम्राज्य



**नाशिक ।** मेरी - रासबिहारी लिंकरोडवर खड्डयांचे साम्राज्य असून हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे. रस्ता तात्काळ दुरूस्त करण्यात यावा अन्यथा महापालिकेसमोर आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेच्या ठाकरे गटातर्फे देण्यात आला आहे.

दिंडोरीरोड येथून राज्य महामार्गास जोडणारा रस्ता म्हणजे मेरी रासबिहारी लिंक रोड आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. त्यातच गॅस पाईपलाईनच्या खोदकामामुळे रस्त्याची साईड पट्टी पूर्णतः उखडली असून त्याठिकाणीही खड्डे पडले आहेत. चार महिन्यात या रस्त्यावर अनेक मोठमोठे अपघात झालेत. अनेकांचे जीव गेलेत तर अनेक जण जायबंदी झालेत. सोमवारी रात्री तोरणे हॉस्पिटलसमोर अपघात होऊन हितेश पाटील या तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

रस्ता अरुंद व वळणाचा असून, ठिकाणी अवजड वाहतूकीचे प्रमाण जास्त आहे. वणी गुजरात कडे जाणाऱ्या व पेठ धरमपूर कडे जाणाऱ्या वाहनांसाठी शहरा बाहेरून जोडणारा हा मार्ग आहे. या रस्त्याची त्वरित डागडुजी करून रस्ता डिपी प्लॅन नुसार रुंद करावा, अशी मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत . नागरी वस्ती वाढल्याने वाहांनाचे प्रमाण वाढले आहे. त्यात अवजड वाहातुक या मुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत योग्य ती कार्यवाही करून लवकरात लवकर रस्ता दुरुस्त करण्यात यावा, अन्यथा महापालिका मुख्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा ठाकरे गटाचे उपमहानगर प्रमुख सुनिल निरगुडे व शिवसेना पंचवटी विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.




## शेतकरी संघटनेच्या तालुका संपर्क प्रमुखपदी चंद्रकांत आडोळे

**इगतपुरी ।** शेतकरी संघटनेच्या इगतपुरी तालुका संपर्क प्रमुखपदी चंद्रकांत आडोळे यांची निवड करण्यात आली आहे. नाशिक जिल्हा शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील ओझर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत शरद जोशी यांची ८९ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष देवीदास पवार यांच्या हस्ते इगतपुरीचे चंद्रकांत आडोळे यांना इगतपुरी तालुका संपर्क निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी चंद्रकांत आडोळे यांनी बोलतांना सांगितले की, शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मी अहोरात्र मेहनत घेऊन शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सोडवण्यास बांधील राहील. चंद्रकांत आडोळे यांची तालुका संपर्क पदी निवड झाल्याबद्दल इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. या प्रसंगी चंद्रकांत आडोळे यांचे बाळासाहेब धुमाळ, किसन शिंदे, बाळकृष्ण नाठे,लक्ष्मण मते, रामनाथ ढिकले,सोपान कडलग, रामचंद्र मामा बोबले, संतू पाटील झांबरे, केदू पाटील बोराडे, संतू पाटील बोराडे, रामदास गायकर, भागवत भगत महेश मालुजकर, संदीप चव्हाण, वसत चव्हाण, सोनू आडोळे यांनी अभिनंदन केले.

## अशोकराव मुरकुटे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर यशस्वी



**सिन्नर ।** तालुक्यातील संभाजीनगर भागात कै. अशोकराव राणुजी मुरकुटे यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त आयोजित मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात १५० हून अधिक नागरिकांनी आपली मोफत आरोग्य तपासणी व निदान करून घेतले. गणेशोत्सव आणि पुण्यतिथीचा संगम साधत राजे संभाजीनगर युवा प्रतिष्ठान, सिन्नर मंडळाने हा उपक्रम समाजोपयोगी पद्धतीने राबविला.

शिबिराचे आयोजन मराठा विद्या प्रसारक समाजाचे डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक यांच्या सहकार्याने करण्यात आले. या पुढील काळात देखील सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम सातत्याने राबविले जातील, असे आश्वासन प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आले. या उपक्रमासाठी मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, संचालक संदीप गुळवे, रमेश पिंगळे, ॲड. युवराज ठाकरे यांचे विशेष सहकार्य लाभले. राजे संभाजीनगर युवा प्रतिष्ठान, संभाजीनगर, सिन्नर यांनी आयोजन केले होते.

## देवळालीत भजन स्पर्धेला भजनी मंडळांचा प्रतिसाद




**देवळाली कॅम्प ।** येथील शिवयुवा प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव उत्सव मंडळ यांच्या माध्यमातून गणेशोत्सवा निमित्त तालुका स्तरीय भव्य महिला पुरुष व बाल गट भजन स्पर्धा व गायन स्पर्धा देवळाली विजयनगर येथील तुळजा भवानी माता मंदिर येथे आयोजीत करण्यात आली होती.

यावेळी भजनी मंडळासह बाल भजनी मंडळानी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाराष्ट्रतील संत परंपरा संतांचा मानवतेचा विचार जनमाणसात रुजावा या उद्देशाने गेल्या वर्षांपासुन सातत्याने या भजन स्पर्धेच आयोजन करण्यात येत असते.या मध्ये नाशिक तालुक्यातील मोठ्याप्रणावर भजनी मंडळांनी सहभाग घेतला यासाठी रोख रक्कम आकर्षक पारितोषिके स्पर्धकांना ठेवण्यात आली.

यावेळी भैरवनाथ प्रसादिक बाल भजनी मंडळ, श्री संत ज्ञानेश्वर बाल भजनी मंडळ चिंचोली, श्री गजानन महाराज भजनी मंडळ, श्री संत तुकाराम भजनी मंडळ, तुळजा भवानी महिला भजनी मंडळ, गुरूमाऊली महिला भजनी मंडळ यासह अनेक नामवंत भजनी मंडळांनी सहभाग नोंदवला होता. यात भजनी मंडळांनी अभंगा बरोबरच गवळणी सादर केल्या. यावेळी सुत्रसंचालन प्रा. ललित भदे यांनी व स्पर्धेचे व्यवस्थापन शिवयुवा प्रतिष्ठान अध्यक्ष प्रमोद मोजाड, राजेंद्र बेरड, ह.भ.प. ज्ञानेश्वर निसाळ, विनोद डांगे, हेमंत गायकवाड, सतीश थोरात, गणपत शेलार, आकाश बोराडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी यांनी केले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा. ललित भदे, संदीप शेटे यांनी परिश्रम घेतले. परीक्षक म्हणून प्रमोद खापरे, खंडेराव जुंद्रे बाबा,वसंदीप शेटे आदींनी काम बघितले.

## ...अन् बसच्या चालक, वाहकांनी कर्तव्याबरोबरच माणुसकी जपली

नैवेद्या बिदरी यांजकडून





> जनसामान्यांमध्ये लाल परीची विश्वासर्हता द्विगुणित केल्याबद्दल आगार व्यवस्थापक नागरे यांनी चालक, वाहक यांचा सत्कार केला. चालक वाहकांनी कर्तव्याबरोबरच माणुसकी जपली. लाल परीच्या सेवकांची तत्परता प्रवाशांनी अनुभवली.
>
> **- विक्रम नागरे, आगारप्रमुख, मनमाड**

**मनमाड ।** मनुष्य प्राण्याचा जन्म आणि मृत्यू कधी होते आणि कसा होईल हे कोणीही सांगू शकत नाही असाच काही अनुभव प्रवाशांच्या सेवेसाठी लालपरी (परिवहन महामंडळाची एसटी बस ) असे बिद्रवाक्य घेवून त्याप्रमाणे गेल्या ६५ वर्षांपासून वाटचाल करणाऱ्या एसटी महामंडळाच्या बस आगारातील चालक आणि वाहकांना मानवतेचे दर्शन गुरुवारी घडविले.

याबाबतची माहिती अशी की, मनमाड आगाराची राजापूर-मनमाड मुक्कामी बस (नं. एमएच १४ बीटी ४४९५) सकाळी मनमाडकडे येत होती. या मार्गावर भालूर येथील रहिवासी सौ. सुनिता किशोर ढगे या बसमध्ये दवाखान्यात येण्यासाठी बसल्या. सकाळी पावणेसातच्या सुमारास सदर बस रेल्वे ओव्हरब्रिज येथे आल्यानंतर सौ. सुनिता यांना असह्य प्रसुती वेदना जाणवायला लागल्या. त्यांच्यासोबत असलेल्या ज्येष्ठ महिलांनी ही बाब चालक राहूल पवार व वाहक संजय पवार यांच्या निदर्शनास आणून दिली. व तात्काळ बस थांबविण्याची विनंती केली.

मला माझ्या सुनेला रिक्षात बसवून दवाखान्यात न्यावे लागणार आहे. तिची प्रसुती कधीही होवू शकते असे सांगितल्यावर चालक वाहकांनी प्रसंगावधान राखून वेळेचा अपव्यय न करता राजापूर मनमाड बस थेट उपजिल्हा रूग्णालयाकडे वळविली. अवघ्या काही मिनिटांत ही बस रूग्णालयात आल्यावर आरोग्य सेविकांनी तात्काळ धावपळ करत बसमधील सौ. सुनिता यांची तपासणी केली. तेव्हा बसमध्ये त्यांची प्रसुती झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सर्व आवश्यक ते उपाययोजना करून बाळाला व आईला सुखरूप बसमध्ये उतरविले व उपजिल्हा रूग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

याचवेळी जर बस चालक वाहकांनी अर्ध्या रस्त्यात बस थांबवून रिक्षाची वाट बघितली असती तर अधिक विलंब झाला असता पण प्रसंगावधान राखल्याने व बस तात्काळ उपजिल्हा रूग्णालयात नेल्याने कोणताही अनर्थ होवू शकला नाही. याबद्दल बसमधील उपस्थित सर्व प्रवाशांनी आणि नागरीकांनी बस चालक, वाहक यांचे कौतुक केले. एस.टी.बस कर्मचाऱ्यांनी माणुसकीचे दर्शन घडविले अशा कृतीमुळेच प्रवासी बांधवांचा लाल परीवर असलेला विश्वास अढळ आहे.

**चालक, वाहकाचा सत्कार...**

धावत्या बसमध्ये प्रसुती कळा सुरू झाल्याने बाका प्रसंग उद्भवला पण चालक वाहकांनी प्रसंगावधान राखून तात्काळ राजापूर-मनमाड बस थेट मनमाड उपजिल्हा रूग्णालयात दाखल केली. आणि पुढील प्रक्रिया अतिशय सुरळीतपणे पार पडली. बाळ बाळंतिण सुखरूप असल्याने प्रवाशांसह बस चालकांनी समाधान व्यक्त केले. याबद्दल मनमाड बस आगाराचे आगारप्रमुख विक्रम नागरे यांच्याहस्ते चालक राहूल गंगाधर पवार, वाहक संजय शांताराम पवार यांचा सत्कार करण्यात आला.

## महत्त्वाचे

### पेठ तालुक्यात कर्ज परतफेड समोपचार योजनेचे मार्गदर्शन

**पेठ ।** नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पेठ, जोगमोडी,करंजाळी शाखेच्या वतिने सामोपचाराने परतफेड योजने अंतर्गत घरोघर जावून कर्जदारांचे प्रबोधन करण्यात येत आहे. जिल्हा बँकेने २०२५\२६ समोपचार योजना सुरू केली असून या योजनेची माहीती शाखेचे अधिकारी कर्मचारीवर्ग घरोघरी जात कर्जदारांचे प्रबोधन करत आहेत, योजनेअंतर्गत थकबाकीदार खातेदारांच्या व्याजदरात सवलत मिळत असून मयत थकबाकीदार खातेदारांच्या वारसांना बँकेकडून सवलत देण्यात नियोजन असून सहकारी संस्था थकबाकीदार व बँकेमार्फत थेट कर्ज पुरवठा केलेल्या सभासदांच्या समोपचार कर्ज फेड योजना आहे. ३० जुन २०२२ पुर्वी ज्यांनी कर्ज घेतले आहे अशांसाठी ही योजना उपयुक्त ठरत असून वसुलीसाठी तीन टप्पे करून कर्ज परतफेडीची व्यवस्था करण्यात आली आहे. यात प्रथम १० टक्के नंतर १५ टक्के व ७५ टक्के रक्कम भरण्याची सवलत आहे. थकीतकर्ज एनपीए त्याचा भरणा पद्धत याबाबतची माहिती कर्जदार शेतकरी कुटुंबाला दिली जात आहे.

### नंदनवन हास्य क्लबतर्फे आदर्श शिक्षकांचा सत्कार

**नाशिक ।** शिक्षक दिनाचे औचित्य साधून चांदशी येथील नंदनवन हास्य क्लबतर्फे आदर्श शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष शरद मंडलिक होते. सत्कारार्थी



शिक्षकांमध्ये अनुराधा देशपांडे,मीरा पाटील, अर्चना टांकसाळे,किशोर देशमुख रवींद्र चव्हाण, डॉ.दिलीप सोनवणे यांचा समावेश होता. बी.बी. मोरे, गिरीशचंद शर्मा,कमल उगले,कलावती राठोड यांच्या हस्ते सत्कार सोहळा झाला.ज्ञानदानाबरोबरच संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य शिक्षक करतो. समाजात शिक्षकांना सर्वाधिक सन्मान मिळतो आणि म्हणूनच त्यांचे कार्य महान आहे, असे किशोर देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले. सूत्रसंचालन, परिचय व आभार प्रदर्शन प्रियदर्शन टांकसाळे यांनी केले. कार्यक्रमास हास्य क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दोघे वाहून गेले; दोघांचा बुडून मृत्यू

**नाशिक ।** भावपूर्ण वातारवणात श्री गणरायाला निरोप देत असताना शहरासह जिल्ह्यात पाण्यात बुडून चार जणांना मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली असून विसर्जनाला गालबोट लागले. चौघांच्या मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे. दहा दिवस उत्साहात गणेशोत्सव साजरा केल्यानंतर शनिवारी (दि.६) अनंत चतुदर्शीला श्री गणरायाला निरोप देण्यात आला. सार्वजनिक मंडळांच्यावतीने मिरवणूक काढण्यात आली. प्रविण चव्हाण (रा. सातपूर कॉलनी) हे आनंदवल्ली येथील पुलाजवळ विसर्जन करीत असताना वाहून गेल्याची घटना घडली. महापालिकेचा अग्निशमनदल व आपदा मित्रच्यावतीने चव्हाण यांचा शोध घेतला जात आहे. गोवर्धन शिवारातील विष्णू डगळे (वय ३४, रा. गंगापूर) हेही विसर्जनावेळी वाहून गेले. सिन्नर तालुक्यातील सरदवाडी धरणात श्री गणरायाचे विसर्जन करीत असताना ओमप्रकाश लिलहारे (वय ३७,रा. पास्ते) यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.मौजे देसराने (ता. कळवण) येथील पुनद नदीत गणपती विसर्जन करताना फरशी वरुन पाय घसरून नदीत बुडाल्याने दिनेश राजभोज (वय-३९) यांचा मृत्यू झाला.

### दत्तात्रय गवळींच्या निवडीचे सिन्नर तालुक्यात स्वागत

**सिन्नर ।** नायगाव (ता. सिन्नर) येथील दत्तात्रय सहादू गवळी यांची भारतीय जनता पक्षाच्या



जिल्हा कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे. सिन्नर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 'योग्य व्यक्तीची योग्य पदावर निवड' या शब्दात त्यांच्या निवडीचे स्वागत केले आहे. श्री गवळी यांची राजकीय कारकीर्द पूर्वीपासून अतिशय प्रामाणिक व ध्येयवादी राहिली आहे. राजकारणात प्रवेश केल्यानंतर स्वर्गीय प्रकाशशेठ शहा यांचे निकटचे सहकारी म्हणून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. तत्कालीन मंत्री स्वर्गीय तुकाराम दिगोळे यांचे उजवे हात म्हणून त्यांना ओळखले जात होते. नाशिक जिल्हा दूध संघाचे चेअरमन म्हणून त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे काम करून जिल्हाभर स्वतःची प्रतिमा तयार केली. कालांतराने त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करून सिन्नर तालुक्यात पक्षाचे प्रामाणिकपणे काम केले. प्रत्येक निवडणुकीत भाजप व सहयोगी पक्षांना मदत करण्यासाठी ते सक्रिय राहतात. विधानसभा निवडणुकीत मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासाठी त्यांनी स्वतःला झोकून देऊन काम केले होते. त्यांच्या या कामाची दखल घेऊन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष (दक्षिण) प्रा. सुनील बच्छाव यांनी त्यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती केली. आपल्याला दिलेली जबाबदारी चोख व प्रामाणिकपणे पार पाडू, अशी प्रतिक्रिया निवडीनंतर त्यांनी दिली.

## महत्त्वाचे

### इगतपुरी तालुक्यात बिबट्याच्या दहशतीने ग्रामस्थ भयभीत

**कावनई ।** इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागासह कावनई, रायाबे आदी भागात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा मुक्तसंचार वाढला असून त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले



आहेत. कावनई येथील गावालगत असलेल्या हॉटेल कपिलधारा रिसॉर्टवर बिबट्याने धुमाकूळ घातला असून गावांत या बिबट्याकडून पाळीव जनावरांवर हल्ला करून फडशा पाडला जात असल्याने या बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने तातडीने पिंजरे बसवावेत, अशी मागणी हॉटेल मालक ज्ञानेश्वर सिरसाट यांनी केली आहे.इगतपुरी तालुक्यात सर्वच भागात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याचा मुक्तसचार वाढला असून हे बिबटे गावात तसेच नागरी वस्तीत शिरून पाळीव जनावरांवर हल्ले करून त्यांचा फडशा पाडीत असल्याने शेतकऱ्यांच्या पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे आहे. हे बिबटे नागरिकांवर हल्ले करीत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. दरम्यान कावनई भागात असणा-या बिबट्याने शेतकऱ्यांच्या शेळ्यांचा फडशा पाडल्याची घटना नुकतीच घडली आहे. दरम्यान या बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने पिंजरे लावावेत अशी मागणी होत आहे.

### बीवायके महाविद्यालयात अवयवदान कार्यक्रम संपन्न

**नाशिक ।** येथील बीवायके वरीष्ठ महाविद्यालयात विद्यार्थीनीं मंच आणि महिला सक्षमीकरण कक्ष यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाचा



अवयवदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. प्रतिमा गेडाम, डॉ. स्वप्निल सांगळे, डॉ. अमोल गायकवाड आणि वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते किसन वाळवी कार्यक्रमाला उपस्थित होते. डॉ. सांगळे यांनी अतिशय सोप्या शब्दात अवयवदानाचे महत्त्व प्रेझेंटेशन द्वारे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना सांगितले आणि त्या विषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. प्रतिमा गेडाम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. लिना भट यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपप्राचार्य डॉ. प्रसाद कुलकर्णी, डॉ. सुवर्णा कदम, डॉ. सुषुम्ना काणे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थीनी मंचच्या प्रमुख डॉ. संगिता मोरे, महिला सक्षमीकरण कक्षाच्या प्रमुख डॉ.पल्लवी जोशी यांनी केले. सहकारी काण्णव, नवरे, कुलकर्णी, काळे, पाटील, लिमये, एलिझाबेथ, केदार, कदम या प्राध्यापकांनी कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मृण्मयी कुलकर्णी, मृण्मयी तारे या विद्यार्थ्यांनींनी केले.

### केबीएच विद्यालयात विद्यार्थी बनले शिक्षक

**नाशिक ।** येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालयात ५ सप्टेंबर या दिवशी स्वतंत्र




भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जन्मदिनी शिक्षक दिन साजरा केला गेला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रवींद्र बाचकर होते. या प्रसंगी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये आदर्श शिक्षक विद्यार्थी प्रथम क्रमांक परि देशले, द्वितीय क्रमांक पूर्वा बच्छाव, तृतीय क्रमांक हितार्थी पाटील या विद्यार्थिनींना मिळाला. शिक्षक वक्ते पी. आर. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी शिक्षक वक्ते यामध्ये ट्विंकल जैन, पूर्वा बच्छाव, संकेत वराडे यांनी भाषणे केली. तसेच मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, शिक्षक या सर्व भूमिका विद्यार्थ्यांनी साकारल्या. त्यांनी आपल्या भाषणातून शिकवताना आलेला अनुभव सांगितला. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजय अहिरे (उप मुख्याध्यापक), विजय निकम (पर्यवेक्षक) हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष रवींद्र बाचकर यांनी शिक्षकाचे महत्त्व का असते याविषयी विद्यार्थ्यांना सांगितले.

### सुभाष उगले यांचे निधन

**सिन्नर ।** येथील विजयनगर (बँक कॉलनी)



येथील रहिवाशी तसेच नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे निवृत्त शाखा व्यवस्थापक सुभाष भिमाजी उगले (वय ७०) यांचे दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, विवाहित मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

# ‘माझी वसुंधरा’ योजनेतील घोटाळा

## ठेकेदाराचा पाप लपविण्याचा प्रयत्न फसला । शेकडो झाडे आजही अडगळीत

**नाशिक ।** हरितक्रांतीच्या नावाखाली राबविण्यात आलेली ‘माझी वसुंधरा’ योजना भ्रष्टाचाराच्या गर्तेत सापडली आहे.त्र्यंबक परिसरात लावण्यासाठी आणलेली हजारो झाडांची रोपे अक्षरशः मरून पडल्याचे वृत्त दै. महासागरने उघड केल्यानंतर, संबंधित ‘लाडक्या’ ठेकेदाराने जनार्दन स्वामी मंदिराजवळ दडवून ठेवलेली झाडांची रोपे ट्रॅक्टर लावून रातोरात गायब केली होती. मृत झाडे हटवून पुरावे नष्ट करण्याचा ठेकेदाराचा केविलवाणा प्रयत्न अखेर फसला असून, आजही शेकडो झाडे ‘त्या’ ठिकाणी पडून आहेत. ठेकेदाराने रातोरात झाडे हटवून आपले पाप झाकण्याचा प्रयत्न केला, मात्र आजही अनेक झाडे सडलेली व कोमेजलेल्या अवस्थेत पडलेली आहेत. पाण्याअभावी लावलेली झाडे मरून गेली असून, अनेक ठिकाणी केवळ रिकाम्या जाळ्याच उभ्या दिसत आहेत. झाडांची ही दुर्दशा पाहून त्र्यंबकवासीयांचा संताप अनावर झाला आहे. कागदोपत्री हजारो झाडे लावल्याचे दाखवून प्रत्यक्षात काहीच काम न झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. लाखो रुपयांचा निधी झाडांसाठी मंजूर झाला, मात्र हा पैसा झाडांवर न खर्च होता थेट ठेकेदारांच्या खिशात





गेला, असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. नगरपरिषदेच्या निधीवर लाडका ठेकेदार पोसला जात असल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. या सर्व गैरप्रकारानंतर आता त्र्यंबक परिसरात ठेकेदाराविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे. “शासकीय निधीचा अपहार आणि नैसर्गिक संपत्तीचे नुकसान हा गंभीर गुन्हा आहे. यासाठी खऱ्या कंत्राटदाराची चौकशी करून निधी वसूल करावा,” अशी मागणी स्थानिक नागरिक व सामाजिक संस्थांकडून केली जात आहे.

दै.महासागरने या घोटाळ्याचा बुरखा फाडल्यानंतर त्र्यंबकमध्ये उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. ट्रॅक्टरने झाडे गायब करून पुरावे पुसण्याचा प्रयत्न ठेकेदाराने केला असला तरी, प्रत्यक्ष वास्तव दिसून येत आहे. ठेकेदाराच्या बेजबाबदारपणा मुळे आजही शेकडो झाडे सडलेली, मरून पडलेली आहेत.त्या मुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# गणपती गेले गावाला चैन पडेना आम्हाला...

**नाशिक ।** नाशिक ढोलचा दणदणाट... पारंपरिक वाद्यांचा गजर... आधुनिक वाद्य डीजेचा खणखणाट... गुलालाची उधळण... आकाशात झेपावणारे भगवे ध्वज... नेत्रदीपक विद्युत रोषणाई... सजवलेले आकर्षक चित्ररथ... विविध मनमोहक देखावे-सजावट... सर्वत्र चाललेला श्रीगणेशाचा जयजयकार... लाल-भगवे फेटे परिधान केलेले महिला-पुरुष... वाद्यांच्या गजरात बेधुंद थिरकणारी तरुणाई अन ठेका धरणारे आबालवृद्ध... अशा भारावलेल्या वातावरणात लाखोंच्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झालेल्या गणेशभक्तांनी लाडक्या बाप्पाला निरोप दिला. दाटून आलेला कंठ आणि पाणावलेल्या नेत्रांनी निरोप देतांनाच त्याच्या भक्तांनी पुढच्या वर्षी लवकर येण्याचे आवतन दिलं.

## दाटून आलेला कंठांनी भाविकांकडून बाप्पांना निरोप...





यंदा अकराव्या दिवशी गणेशोत्सवाची विसर्जनाच्या निमित्ताने सांगता झाली. शहर-जिल्ह्यातील गणेशभक्तांनी दिवसभरात त्यांच्या सोयी-सवडीने घराघरातील श्रीगणेशाचे विसर्जन केले. सार्वजनिक मंडळांनी मिरवणुकीने श्रींचे विसर्जन केले. यानिमित्ताने शहर-जिल्ह्यात अनेक भव्यदिव्य मिरवणुका काढण्यात आल्या. नाशिक शहरातील सिडको, सातपूर, नाशिकरोड आदींसह उपनगरांमध्ये दिवसभर मिरवणुका सुरू होत्या. सकाळपासून सुरू झालेल्या मिरवणुका रात्री उशिरापर्यंत सुरूच होत्या. यंदा जवळपास सर्वच नागरिक आणि सार्वजनिक मंडळांनी मूर्तीदान संकल्पना स्वीकारली. निर्माल्यही स्वयंस्फूर्तीने घंटागाडीत, निर्माल्य कलशात टाकले. कृत्रिम पाणवठ्यावर श्रींच्या मूर्तींचे विसर्जन झाल्याने खऱ्या अर्थाने पर्यावरणपूरक गणेशोत्सव झाला, असे म्हणता येईल. नाशिक शहरातील मुख्य पारंपरिक मिरवणुकीला जुने नाशिकमधील वाकडी बारव येथून सुरुवात झाली. कुंभमेळा मंत्री तथा जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून मिरवणुकिला प्रारंभ झाला. यावेळी लोकप्रतिनिधी, विविध पक्षांचे पदाधिकारी, नेते मंडळी उपस्थित होते.

शहरातील गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत भर पावसात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभाग घेतला. सकाळी ना. गिरीश महाजन यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आणि गणरायाची आरती करून विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ झाला. मनाचा गणपती नाशिक महापालिका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांची विधिवत पूजा करून महंत भक्तिचरणदास महाराज यांच्या समवेत गिरीश महाजन नाशिक महापालिका आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल यांसह गणेशोत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी या मिरवणूक शुभारंभ प्रसंगी उपस्थित होते. यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः ढोल वाजवून मिरवणुकीत उत्साहपूर्ण वातावरणात सहभाग नोंदवला नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यांनी देखील ढोल पथकातील झेंडा हातात घेऊन व ढोल वाजवून अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले. ही मिरवणूक रात्री उशिरापर्यंत अत्यंत उत्साहात सुरूच होती. मिरवणुकीवर पावसाचे सावट असल्याने किंबहुना अधून मधून पावसाच्या कमी-जास्त प्रमाणात कोसळत असल्याने प्रेक्षक गणेशभक्तांची गर्दी फारशी नसली तरी उत्साह मात्र प्रचंड होता. रात्री साडेसात नंतर मात्र पाऊस उघडल्याने गणेशभक्तांची गर्दी उसळली होती. यामध्ये तरुणाईचे प्रमाणात विलक्षण होते. राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संस्था-मंडळे यांनी मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी स्वागतकक्ष उभारले होते. मिरवणुकीत काही अनुचित-अप्रिय घटना घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. महापालिकेने शहरात अनेक ठिकाणी कृत्रिम तलाव, मूर्ती संकलन केंद्र, निर्माल्य संकलन केंद्रे उभारले होते. वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक शाखेने पर्यायी मार्गाने वाहतूक वळवत कोंडी टाळली. यासाठी बॅरिकेडिंगही लावण्यात आली होती. वाकडी बारव येथून निघालेले सार्वजनिक मंडलंचत श्रीगणेशाचे चित्ररथ मेनरोड, धुमाळ पॉईंट, महात्मा गांधी मार्ग, मेहेर सिग्नल, अशोक स्तंभ, रविवार कारंजा, मालेगाव स्टँडमार्गे गोदावरी घाटावर गेले. तेथे मिरवणुकीची सांगता झाली.मिरवणुकीला गणेशभक्तांची अलोट गर्दी उसळली होती. शिवसेवा मित्रमंडळ, युवक मित्रमंडळ, दंडे हनुमान, साक्षी गणेश मंडळ, पिंपळपार मंडळ, नाशिकचा राजा मंडळ, अशोक स्तंभ मित्रमंडळ, पंचवटी मित्रमंडळ यासह अनेक सार्वजनिक श्रीगणेश मंडळांचे चित्ररथ मिरवणुकीत सहभागी झाले होते.

### मूर्तीदान संकल्पनेला प्रतिसाद

यंदा श्रीगणेशोत्सवात महापालिकेने केलेल्या मूर्तीदान संकल्पनेला चांगला प्रतिसाद मिळाला. महापालिकेच्या सहाही विभाग मिळून एकूण २ लाख २६ हजार १७७ गणेशमूर्त्यांचे संकलन झाले. विभागनिहाय मूर्ती संकलन पुढीलप्रमाणे : पंचवटी विभाग - ९०२६९, सातपूर विभाग, २२७९२, सिडको विभाग २९८६७, विभाग विभाग, ११३२८, पूर्व विभाग- २१०४६ आणि नाशिक रोड विभाग ५०८७६ गणेश मूर्ती याप्रमाणे संकलन झाले.













# ‘देव द्या, देवपण घ्या’ उपक्रमास नाशिककरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नाशिक ।** ‘देव द्या, देवपण घ्या’ उपक्रमांत यापुर्वीचे मुर्तीदानाचे सर्व विक्रम मोडीत काढुन नाशिककरांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याची माहिती संयोजक आकाश पगार यांनी दिला आहे.

गोदावरी नदीला प्रदुषणापासुन वाचविण्यासाठी १५ वर्षांपूर्वी मुर्ती व निर्माल्य दान करण्यासाठीचा देव द्या, देवपण घ्या हा उपक्रम सुरु करण्यात आला होता. यानिमित्ताने प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या लाखो मुर्तींचे दान नाशिककरांकडुन करण्यात येत असुन १५ वर्षांपूर्वी लावलेले देव द्या, देवपण घ्या ! चे छोटेसे रोपटे फोफावत जाऊन अवघ्या महाराष्ट्रात त्यांचे अनुकरण होत असल्याचे दिसत आहे. गणेश विसर्जनाच्या निमित्ताने चोपडा लॉन्सजवळील गोदापार्क येथे सकाळी ८ वाजेपासून “देव द्या देवपण घ्या” या उपक्रमाचे कार्यकर्ते मूर्ती स्विकारण्यासाठी उपस्थित होते. गणेशभक्तांना आरती करण्याची व्यवस्था देखील यावेळी उपलब्ध करुन देण्यात आली होती.




प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंगकाम व इतर सौंदर्यप्रसाधने व निर्माल्यामुळे गोदावरी नदीचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. गणेशोत्सवातील १० दिवस ‘सुविचार मंच’च्या कार्यकर्त्यांनी जनजागृती करणारे पत्रके घराघरात वाटली होती. तसेच सोशल मिडियाच्या माध्यमातून देखील प्रभावी प्रचार तसेच आवाहन करण्यात आले होते. नाशिकच्या लाखो गोदाप्रेमी भाविकांनी या आवाहनाला भरभरून पाठिंबा दिला. दिड, पाच व सात दिवसांच्या घरगुती गणेशोत्सवातील मूर्ती देखील स्वीकारण्यात आल्या होत्या. गुलाबी रंगाचे आकर्षक कुर्ता घातलेले कार्यकर्ते नाशिककरांचे लक्ष वेधून घेत होते. यावेळी लहानग्यांपासून ते वयोवृद्ध नागरिक मोठया संख्येने गणेश मूर्ती दान करत होते. या मुर्ती अत्यंत भावपूर्ण वातावरणात सुपूर्द करण्यात येत होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश पगार, विशाल गांगुर्डे, सागर बाविस्कर, सुजित सोनवणे, जीत मोरे, राहुल मकवाना, सोनू जाधव, ललित पिंगळे, योगेश निमसे, मदन म्हैसधुणे, अक्षय नेर, तुषार गायकवाड, अविनाश बरबडे, वैभव बारहाते, संकेत निमसे, कुणाल सानप, अमोल भांड, महेश मंडाले, आकाश खरे, जीत मोरे, शरद खालकर, अपुर्व सोनवणे, योगेश निमसे, सार्वर्थ आसवा, रोहित कळमकर, ओम निकम, संदिप उफाडे, हर्षल वारुळे, रोशन पगार, वैष्णवी जोशी, गौरी घाटोळ, जयश्री नंदवाणी, दुर्गा गुप्ता, पुजा भवर, हर्षदा पाटील, कल्याणी पाटील, साक्षी पवार, श्रृती गणोरे, दिव्यजा ठाकरे, नमर्ता जाधव, मयुरी जोपळे आदींनी परिश्रम घेतले.

**सुविकास नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, नाशिक**
नोंदणी क्रमांक- एन.एस.के./एन.एस.के./आर.एस.आर./६१८९/२०२३,
नोंदणी दिनांक- ०६/११/२०२३.

**२ री वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

(फक्त सभासदांसाठी) दि. ०८/०९/२०२५

श्री.रा.रा. ____________ यांस संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २ री वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२७/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. संस्थेच्या कार्यालयात म्हणजे ऑफिस नं.४०, पहिला मजला, सिटी सेंटर, सिंधी कॉलनीसमोर, जेलरोड, नाशिकरोड, ता.जि.नाशिक-४२२१०१ येथे संस्थेचे संस्थापक चेअरमन श्री. नंदू महिपत वारुंगसे यांच्या अध्यक्षतेखाली पुढील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी भरविण्यात येत आहे, तरी सर्व सभासदांनी वेळेत उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढे येणारे विषय**- १) मा. नियोजित अध्यक्षांना सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणेस विनंती करणे. २) मागील झालेल्या सर्वसाधारण सभा दि.२२/०९/२०२४ रोजीचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे. ३) सन २०२४-२०२५ या सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रके वाचून नोंद घेणे व मंजुरी देणे. ४) सन २०२४-२०२५ चा शासकीय हिशोब तपासणी अहवाल व सन २०२४-२०२५ चा दोष दुरुस्ती अहवाल वाचुन नोंद घेणे व मंजुरी देणे. ५) सन २०२५-२०२६ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी पॅनलवरील लेखा परीक्षकाची नेमणूक करणे. ६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व पतसंस्थांसाठी लागू केलेल्या सुधारित आदेश उपविधीबाबत चर्चा करणे व तिचा स्वीकार करून अंमलबजावणी करणे. ७) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे. ८) मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

आपले नम्र
मा. संचालक मंडळाचे आदेशावरून
सौ. सुरेखा नंदू वारुंगसे (व्यवस्थापिका)

# म्हाडाचा 13 वा लोकशाही दिन 15 सप्टेंबर रोजी

**मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) तेरावा लोकशाही दिन सोमवार दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी, दुपारी १२ वाजेपासून 'म्हाडा'च्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात चौथ्या मजल्यावरील सभागृहात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणार आहे.

जानेवारी-२०२४ पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयातील सभागृहात म्हाडा लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. आजतागायत म्हाडामध्ये बारा लोकशाही दिन कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

**प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली**

लोकशाही दिनांतर्गत नागरिकांच्या प्राप्त तक्रारी अर्जांवर संबंधित अधिकार्यांअच्या उपस्थितीत थेट व खुली चर्चा केली जाते. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात आली असून नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि त्वरित न्याय मिळत आहे. या उपक्रमामुळे म्हाडा प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकांप्रती संवेदनशील बनले असल्याचा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. प्रत्येक लोकशाही दिन कार्यक्रमापूर्वी जयस्वाल यांच्याकडून यापूर्वी झालेल्या लोकशाही दिनातील प्रकरणांवर अधिकार्यां कडून होत असलेल्या कार्यवाहीचा देखील आढावा घेण्यात येतो. यामुळेच तसेच लोकशाही दिन हा नागरिक आणि प्रशासन यांच्यातील विश्वासाचा मजबूत दुवा ठरत आहे.

**तक्रारींचे तात्काळ निराकरण करवून घ्या!**

म्हाडा प्रशासनाद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, म्हाडा मध्ये आयोजित लोकशाही दिन उपक्रमामध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आपल्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करवून घ्यावे. मात्र न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपील्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणाची पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/ निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसतील असे अर्ज म्हाडा लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाहीत. जे अर्ज लोकशाही दिनाकरिता स्वीकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबंधित विभागाकडे आवश्यक कारवाईसाठी आठ दिवसात पाठवण्यात येतील व त्याची प्रत अर्जदारास देखील पाठविण्यात येईल, अशी माहिती म्हाडामार्फ़त देण्यात आली.

# राज्य निवडणूक आयुक्तांनी घेतला पालिका सार्वत्रिक निवडणूकपूर्व तयारीचा आढावा

**मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकपूर्व तयारी कामांचा महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आज शुक्रवारी झालेल्या बैठकीत सविस्तर आढावा घेतला. सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका प्रशासनाने केलेली पूर्वतयारी परिपूर्ण असल्याचे नमूद करत, राज्य निवडणूक आयोगाने समाधान व्यक्त केले.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल सूद गोयल, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे निवडणूकपूर्व तयारी कामांची माहिती दिली.



**तयारीबाबत समाधान**

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण मतदार संख्या व मतदान केंद्र, मतदार यादी विभाजन, प्रस्तावित मतदान केंद्रांचे वर्गीकरण, आवश्यक मतदान यंत्रे, मतदान यंत्रे साठवणूक व्यवस्था, निवडणूक साहित्य, मतदान केंद्रावरील सोयी-सुविधा, निवडणुकीसाठी आवश्यक अधिकारी- कर्मचारी वर्ग आदी विविध विषयांचा दिनेश वाघमारे यांनी आढावा घेत महापालिकेने केलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले.

**तयारी कामांची माहिती**

महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल सूद गोयल, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे निवडणूकपूर्व तयारी कामांची माहिती दिली. मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील एकूण मतदार संख्या व मतदान केंद्र, मतदार यादी विभाजन, प्रस्तावित मतदान केंद्रांचे वर्गीकरण, आवश्यक मतदान यंत्रे, मतदान यंत्रे साठवणूक व्यवस्था, निवडणूक साहित्य, मतदान केंद्रावरील सोयी-सुविधा, निवडणुकीसाठी आवश्यक अधिकारी- कर्मचारी वर्ग आदी विविध विषयांचा दिनेश वाघमारे यांनी आढावा घेत महानगरपालिकेने केलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले.

**उपाययोजना राबवाव्यात!**

राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे म्हणाले की, मुंबई महापालिका प्रशासनाने निवडणुकीसाठी केलेली पूर्वतयारी परिपूर्ण आहे. मतदान केंद्रांवरील सुविधा वाढवून त्याची प्रभावी जनजागृती करण्यात यावी, जेणेकरून मतदानाची टक्केवारी वाढेल. मागील सार्वत्रिक महापालिका निवडणुकीदरम्यान आलेल्या अडचणींचे निराकरण कशा प्रकारे झाले, याचा विचार करून यंदा अधिक सक्षम उपाययोजना राबवाव्यात. मतदान प्रक्रिया सुरळीत व पारदर्शक पार पडावी, यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलावीत. सर्वांनी पारदर्शक व निर्भयपणे कामकाज करावे. विविध यंत्रणांमध्ये योग्य समन्वय साधून कामकाज सुरळीत व प्रभावीरितीने पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश वाघमारे यांनी दिले. मागील विधानसभा निवडणुकीत महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी अतिउत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाने गौरव केला, त्याबद्दल वाघमारे यांनी गगराणी यांचे अभिनंदन केले.

# म्हाडाच्या 149 अनिवासी गाळे विक्रीसाठीच्या ई-लिलावासाठी मुदतवाढ 16 सप्टेंबरपर्यंत करता येणार अर्ज

**मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी**

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) मुंबईमधील विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या परिसरातील १४९ अनिवासी गाळयांच्या ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी मुदतवाढ देण्यात आली असून सुधारित वेळापत्रकानुसार इच्छुक अर्जदारांना https://eauction.mhada.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे या प्रक्रियेसाठी आता दि. १६ सप्टेंबर, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. १८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संगणकीय प्रणालीमध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी ऑनलाइन बोली स्वरूपातील ई-लिलाव www.eauction.mhada.gov.in या संकेतस्थळावर होणार आहे. दि. १९ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता https://eauction.mhada.gov.in व https://mhada.gov.in या दोन्ही संकेतस्थळांवर ई-लिलावाचा एकत्रित निकाल जाहीर करण्यात येणार आहे. मंडळातर्फे अर्ज करण्यासाठी दुसर्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर लिलावात मुंबईतील मुलुंड गव्हाणपाडा येथे ०६ अनिवासी गाळे, कुर्ला- स्वदेशी मिल येथे ०५, तुंगा पवई येथे ०२, कोपरी पवई येथे २३, चारकोप येथे २३, जुने मागाठाणे बोरीवली पूर्व येथे ०६, महावीर नगर कांदिवली पश्चिम येथे ०६ अनिवासी गाळे, प्रतीक्षा नगर सायन येथे ०९, अँटॉप हिल वडाळा येथे ०३, मालवणी मालाड येथे ४६ अनिवासी गाळे, बिंबिसार नगर गोरेगाव पूर्व येथे १७ अनिवासी गाळे व शास्त्री नगर-गोरेगाव, सिद्धार्थ नगर, मजासवाडी जोगेश्वरी पूर्व येथे प्रत्येकी ०१ अनिवासी गाळा विक्रीसाठी उपलब्ध आहे.

ई लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे, अर्जदाराने महाराष्ट्र राज्यातील सन २०१८ नंतर काढलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून ऑफसेट किंमतीनुसार विहित अनामत रक्कम भरणे गरजेचे आहे. सदर लिलावाबाबत विस्तृत पात्रता निकष, प्रत्येक गाळ्याचे विवरण, सामाजिक आरक्षण व अर्ज करण्याची कार्यपद्धती, सविस्तर अटी व शर्ती, ऑनलाईन अर्ज सूचना,माहितीपुस्तिका याबाबतची माहिती https://eauction.mhada.gov.in व https://mhada.gov.in या संकेतस्थळावरील Lottery>Eauction>eauction या पोर्टलवर उपलब्ध आहे. अर्जदाराने संकेतस्थळावरील व माहिती पुस्तिकेतील सविस्तर सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचूनच अर्ज सादर करावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# अपघातग्रस्त गणेश गोवारी यांचे निधन

**मनोर, दि. ७ : प्रतिनिधी**

मनोर परिसरातील तरुण व्यक्तिमत्त्व गणेश गोवारी यांच्या निधनाने गावात तसेच परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. तातडीने त्यांना वसई येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असतानाही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने अखेर दिनांक ५ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



गणेश गोवारी हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे, सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे नेहमीचे हास्य, लोकांशी जिव्हाळ्याने वागण्याची हातोटी आणि समाजात सर्वांना एकत्र ठेवण्याची त्यांची वृत्ती यामुळे ते परिसरातील तरुणांमध्ये लोकप्रिय होते. त्यांच्या जाण्याने मित्रपरिवार, नातेवाईक, तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक व परिचित मंडळी यांना मोठा धक्का बसला आहे. गणेश यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विशेषतः त्यांच्या पत्नींसाठी हा आघात सहन करणे अत्यंत कठीण ठरत आहे. घरातील एक आधारवड हरपल्याची भावना प्रत्येक कुटुंबीयांच्या मनात आहे. गावकऱ्यांनीही त्यांच्या घरी जाऊन कुटुंबीयांना धीर दिला.

# सिडकोच्या मेट्रो सेवेवर प्रवाशांच्या पसंतीची मोहोर

## मेट्रो मार्ग क्र. 1 ने दोन वर्षांच्या कालावधीमध्ये गाठला विक्रमी 1 कोटी प्रवासी संख्येचा टप्पा

**नवी मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी**

सिडको महामंडळाच्या मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर मार्गावरील प्रवासी संख्येने, मेट्रो मार्गाचे परिचालन सुरू झाल्यापासून, दि. ०६.०९.२०२५ रोजी विक्रमी एक कोटी प्रवासी संख्येचा टप्पा गाठला आहे. मेट्रो सेवा सुरू झाल्यापासून प्रवाशांचा उदंड प्रतिसाद या सेवेला मिळत असल्याने अवघ्या दोन वर्षांत या मार्गावरील प्रवासी संख्येने एक कोटीचा विक्रमी टप्पा गाठला आहे.



नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी केली जात आहे. मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर मार्गाची अंमलबजाणी सर्वप्रथम करण्यात येऊन या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ रोजी मेट्रोचे परिचालन सुरू झाले. सीबीडी बेलापूर परिसरातील शासकीय कार्यालये, तळोजा एमआयडीसी, खारघर व तळोजा परिसरातील सिडकोची गृहसंकुले यांना कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याकरिता हा मार्ग महत्त्वपूर्ण ठरला आहे. मेट्रो सेवेद्वारे नवी मुंबईतील रहिवाशांना जलद व आरामदायी प्रवासाचा उत्तम पर्याय उपलब्ध झाला आहे.

मेट्रो सेवा अधिक कार्यक्षम करण्याकरिता सिडकोतर्फे वेळापत्रकाचे काटेकोर नियोजन करण्यात येऊन सध्या गर्दीच्या वेळी दर १० मिनिटांनी बेलापूर व तळोजा स्थानकांदरम्यान दोन्ही दिशांना मेट्रोच्या फेऱ्या उपलब्ध आहेत. तर उर्वरित वेळांमध्ये दर पंधरा मिनिटांनी मेट्रोची फेरी उपलब्ध आहे. मेट्रोच्या तिकीट दरात तब्बल ३३ टक्के कपात करण्यात येऊन सध्या तिकीटाचा किमान दर रु. १० कमाल रु. ३० इतका आहे. या प्रवासीस्नेही सुधारणांमुळे सदर मार्गावरील मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. यामुळे अवघ्या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये मेट्रोच्या प्रवासी संख्येने एक कोटीचा टप्पा गाठणे शक्य झाले आहे.

# श्रीधर फडके यांचे सांगीतिक अभीष्टचिंतन

**वसई, दि. ७ : प्रतिनिधी**

ज्येष्ठ संगीतकार, गायक श्रीधर फडके यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचे सांगीतिक अभीष्टचिंतन करण्यात येणार आहे.

यानिमित्ताने त्यांच्या समृद्ध संगीत प्रवासाला वाहिलेला एक आगळावेगळा सांगीतिक कार्यक्रम 'झाले मोकळे आकाश' मंगळवार, ९ सप्टेंबरला सायं. ६.३० वाजता विलेपार्ले येथील दीनानाथ नाट्यगृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम जीवनगाणी व स्वरगंधारतर्फे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात ऋषिकेश रानडे, सोनाली कर्णिक, अभिषेक नलावडे, धनश्री देशपांडे, शिल्पा पुणतांबेकर यांसारखे लोकप्रिय गायक श्रीधर फडके यांच्या रचना सादर करणार आहेत. सोबतच श्रीधर फडके यांच्या मुलाखतीचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे निवेदन विघ्नेश जोशी करणार असून, संगीत संयोजन प्रशांत लळित यांचे आहे.

फडके यांच्या सांगीतिक प्रवासाचा आढावा घेणारे 'अमृताच्या जणू ओंजळी' हे सुकन्या जोशी यांनी शब्दांकन केलेले पुस्तक डिंपल प्रकाशनतर्फे प्रकाशित होणार आहे. कार्यक्रमाच्या विनामूल्य प्रवेशिका ६ सप्टेंबरपासून दीनानाथ नाट्यगृहात मिळतील.

**आज का अंदाज**

सोमवार ८ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

**कल्याण बाजार**

| 2 | 3 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 156 | 346 | 600 | 450 |
| 480 | 490 | 123 | 360 |
| 390 | 580 | 268 | 270 |
| 21 | 31 | 60 | 90 |
| 27 | 37 | 65 | 95 |
| 24 | 34 | 68 | 98 |

**मुंबई बाजार**

| 2 | 5 | 6 | 7 |
|---|---|---|---|
| 129 | 500 | 150 | 700 |
| 246 | 357 | 259 | 250 |
| 345 | 456 | 358 | 557 |
| 29 | 50 | 68 | 78 |
| 20 | 59 | 61 | 71 |
| 23 | 53 | 64 | 79 |

८ सप्टेंबर २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 73 | 83 |
| 12 | 42 | 75 | 85 |
| 16 | 46 | 79 | 89 |

सर्व बाजारांसाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
0 8 9 7 6

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034

# पारदर्शकतेतून विश्वासाची निर्मिती: जयका इन्शुरन्स ब्रोकरेजचे नीलेश नगरकरयांची दैदिप्यमान वाटचाल



**नागपूर, ७ सप्टेंबर :** जयका इन्शुरन्स ब्रोकरेजचे संचालक नीलेश नगरकर यांच्यासाठीविमा हे क्षेत्र कधीही निव्वळ पॉलिसी आणि कागदपत्र एवढ्यापुरते मर्यादीत नव्हते. त्यांच्यासाठी हे क्षेत्र व्यक्तीशी संपर्क, विमा संरक्षण आणि ध्येयाने ओतप्रोत भरलेले होते. त्यांच्या शेजारी राहत असलेली एक व्यक्ती युनायटेड इंडिया जनरल इन्शुरन्समध्ये कार्यरत होती. त्यांच्यामुळे प्रेरित होत त्यांचा विमा उद्योगातील प्रवास अगदी लहानपणीच सुरु झाला. कामगारांची भरपाईची प्रकरणे आणि मरीन पॉलिसींशी संबंधित कामकाज पुर्ण करण्यासाठी शेजारच्या त्या काकांबरोबर तेविद्यार्थी दशेत असतानाहीस्थानिक कापड गिरण्यांमध्येनियमित जात असे. त्यांच्यासोबत निलेश नगरकरही जात असे. शेजारच्या काकांबरोबरील सुरुवातीच्या अनुभवामुळे नीलेश यांना विम्याबाबत आयुष्यभराची आवड निर्माण झाली.

जयका मोटर्समध्ये १३ वर्षांपूर्वी दाखल झाल्यानंतरतेथे कार्यरत असताना नगरकर यांना विमा वितरणाच्याविस्तारणाऱ्या क्षेत्राचे महत्व लक्षात आले. कॉर्पोरेट एजंट म्हणून त्यांनी विमा क्षेत्रात पाऊल ठेवले. महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये युनायटेड इंडिया आणि न्यू इंडिया इन्शुरन्स या दोन कंपन्यांचे त्यांनी प्रतिनिधित्व केले. त्यानंतर २०० मध्येत्यांनी स्वतःचा ब्रोकिंग परवाना मिळवून एक मोठी झेप घेतली आणि आज विविध प्रकारच्या विमा क्षेत्रामध्ये भरभराटीला आणलेल्या एका फर्मचा पाया रचला.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुमच्या बहुतेक योजना यशस्वी होतील आणि तुमचा आत्मविश्वासही वाढेल. आज तुमचे वैवाहिक जीवन आनंदी असेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमचे कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडाल, कुटुंबातील सर्वजण तुमची प्रशंसा करतील. आज जास्त व्यस्त असाल.

**मिथुन :** आज खूप व्यस्त असाल. आज तुम्हाला व्यवसायात नफा मिळवण्याची उत्तम संधी मिळेल, तुमच्या उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील, तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल.

**कर्क :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाईल. आज तुम्ही मालमत्तेत गुंतवणूक करण्याचा निर्णय घ्याल आणि तुमच्या जवळच्या व्यक्तीकडून तुम्हाला चांगला सौदा देखील मिळेल.

**सिंह :** आज ऑफिसमध्ये थोडे जास्त काम असेल, ज्यामुळे तुम्हाला शारीरिक थकवा जाणवू शकतो. आज तुम्हाला आर्थिक बाबतीत तुमच्या पालकांकडून पाठिंबा मिळत राहील.

**कन्या :** तुम्हाला वडीलधाजयांचे आशीर्वाद मिळतील. आज तुम्ही समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी एक योजना सुरू कराल. आज कोणतेही नवीन काम सुरू करायचे असेल तर दिवस शुभ आहे.

**तूळ :** आज तुम्ही व्यवसायाशी संबंधित बाबींवर लक्ष केंद्रित कराल आणि ते पुढे नेण्यासाठी कोणाची तरी मदत घ्याल. मित्रांसोबत आज पार्टी कराल, दिवस चांगला घालवाल.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमच्या जवळच्या व्यक्तीची मदत घेऊन प्रलंबित कामे पूर्ण करू शकता. आज सहलीला जाण्याची योजना आखू शकता.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र असेल. आज तुम्ही कामाच्या ठिकाणी चांगले प्रदर्शन कराल, ज्यामध्ये तुम्हाला तुमच्या सहकाजयांचा पूर्ण पाठिंबा मिळेल. तुमचे काम चांगले आणि सहजतेने होईल.

**मकर :** आज कोणत्याही कामात केलेल्या मेहनतीचे योग्य फळ मिळेल आणि तुम्ही तुमचे काम इतरांकडूनही करून घेण्यात यशस्वी व्हाल. शिक्षणात येणाजया अडचणींपासून मुक्तता मिळेल,

**कुंभ :** आज तुम्ही बांधकामाशी संबंधित कामांमध्ये अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊ शकता. तुमच्या जोडीदाराचा प्रकल्पाच्या कामात पाठिंबा मिळेल, जो भविष्यात यशासाठी उपयुक्त ठरेल.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाईल. तुम्हाला अनेक उत्तम रोजगाराच्या संधी मिळतील आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत देखील निर्माण होतील, ज्यामुळे तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल.

## शब्दकोडे क्रमांक २२१२



**आडवे शब्द :-**
१) जमिनीपासून मिळणारे सरकारचे उत्पन्न
६) संदेश
८) जिंकणारा
१०) संगीतातील एक राग
११) धक्का
१२) प्रजा
१३) मृत्यू
१५) नूतन
१७) धैर्य, हिंमत
१८) ठराविक पैसे
१९) दृढता, सोशिकपणा
२१) रसाळ
२३) पोते शिवण्याची सुई
२५) राबता, जाणेयेणे
२७) पराजय
२८) संगीतातील एक राग
२९) ओढा पण मनाचा
३०) बारदान
३१) मुसलमानांचा उपवासाचा महिना
३२) शपथ
३३) ढग
३६) कुराणातील वचने
३८) चामखीळ
४०) प्रसिद्धी, गप्पांचे आगर
४४) एक तारवाद्य
४६) कर्ज
४७) ताठा, गुर्मी, जोर
४८) ओझी वाहणारा
४९) सुसर
५०) कमीतकमी व जास्तीतजास्त
५३) आश्रय
५६) मोहरी
५७) पाणी वाहण्याची कातडी पिशवी
५८) बडबड
६०) बोटाच्या टोकावरील आवरण
६२) मणका
६३) दूध वा दुधाचे पदार्थ
६४) मडके
६५) पुरुष
६६) फुरसत
६७) लोटी
६८) विशेष
६९) नृत्य
७०) अंगारा, रक्षा
७१) पादत्राण
७२) टेहाळणी करणारा
७४) पृथ्वी
७६) दुर्गंधी येऊ लागलेला
७७) पागोट्याव बांधण्याचे रत्नजडित तुरा
७८) अहंकार

**उभे शब्द :-**
१) जलाशय, समुद्र
२) नेत्र
३) माझे
४) हत्या, खून
५) बारीक सारीक
६) आधार नसलेला
७) घराचा मागचा दरवाजा
८) वापर
९) आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू
१४) पावसाचे साठवून ठेवलेले पाणी
१६) पराक्रमी
२२) दरवाजा
२४) महाराष्ट्राची देवता
२६) घोड्याची गाडी,
२८) मारणारा
२९) पाऊल
३०) गाईचे घर
३४) चंद्र,
३५) स्नानगृह
३७) हावरटपणा
३९) किरकोळ सामान
४०) कडक
४१) पत्र
४२) मवाळ धोरण
४३) आकाश
४५) खरकट्याचा ढीग
४८) नक्की, खात्रीने
५१) फक्त, केवळ
५२) संगीतातील एक घराणे
५४) हावरट,
५५) अवधान, लक्ष
५७) अनुमती
५९) जंगलात राहणारे प्राणी
६१) अफूचे बीज
६२) किंचित कडू चव
६३) मधुर
६४) गावातील जुनी वस्ती
६७) मोजणी करणारा
६८) मीठाची चव
७०) पोपट
७३) दुनिया
७५) मलई

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# सुदृढ समाजनिर्मितीसाठी शिक्षकांचे योगदान : प्रा. संदीप जगताप

**नाशिक ।** अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठी शिक्षक नेहमी तत्पर असतो. आपल्या जीवनाला दिशा देत समाज जागृती आणि सुदृढ समाजनिर्मितीसाठी शिक्षकांचे सर्वात मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा.संदीप जगताप यांनी केले.

गिरणा गौरव प्रतिष्ठानच्यावतीने शंकराचार्य कृतकोटी सभागृहात आयोजित 'साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान सोहळ्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार होते.

आपल्या भाषणात प्रा.संदीप जगताप यांनी सादर केलेल्या 'इन्स्पेक्शन' या कवितेने उपस्थित गुरुजनांची दाद मिळवली. तसेच ज्ञानदानाच्या तत्त्वाशी एकनिष्ठ राहून संस्काराचा आणि नव्या विचारांचा वारसा जपणारे आदर्श




शिक्षक समाजाचे परिवर्तन घडवून आणू शकतात, असे उदगार मंत्रालयातील अव्वर सचिव डॉ.नंदकुमार राऊत यांनी काढले. विशेष सरकारी वकील ॲड.विद्या देवरे, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रवीण जोशी यांनीही मनोगत व्यक्त केले. गिरजा महिला मंचच्या सरचिटणीस भारती निकम, जिल्हाध्यक्षा शितल कुयटे, जिल्हा उपाध्यक्षा भाग्यश्री चौधरी मंचावर उपस्थित होत्या. सोमनाथ वाघ-त्र्यंबकेश्वर, प्रकाश पाडवी-सुरगाणा, मंगळू गांगुर्डे-कळवण, योगिता गावित-सुरगाणा, पाटीलबुवा माने-मालेगाव, संगीता सूर्यवंशी-देवळा, अनिता देवराज-नांदगाव, भाग्यश्री खैरनार-निफाड, मनीषा गायकवाड-दिंडोरी, सुरेश लिलके-इगतपुरी, संगीता गायधनी-नाशिक, ज्योती ठोंबरे-दिंडोरी, यमुना इम्पाळ-त्र्यंबकेश्वर, सुनंदा गवंडे-चांदवड, कावेरी दांडगे-येवला, आकांक्षा ठाकरे-सटाणा, भाग्यश्री पवार-सुरगाणा, मीनाक्षी रायते-नाशिक, निर्मला पगार-मालेगाव, मेघावती आखाडे-सिन्नर, रंजना सोनवणे-सटाणा, भारती ठाकरे-देवळा, वैशाली मिंचे-निफाड, सुमन गावडे-त्र्यंबकेश्वर, नरेंद्र पाटील-पेठ, बाबासाहेब बेरगळ-येवला, प्रदीपकुमार रसलपूरकर-नाशिक, मनोज डोंगरे-नांदगाव, उमेश बोरसे-नांदगाव, हरिश्चंद्र भोये-नाशिक, संतोष अहिरे-सटाणा, लक्ष्मण थवील-सुरगाणा, सुभाष सोनवणे-सुरगाणा, भूषण पाटील-सटाणा, उमेश जाधव-पेठ, विश्वास वाघमारे-नाशिक, पांडुरंग वाघमारे-सुरगाणा, संजय काळे-इगतपुरी, मार्तंड जाधव-त्र्यंबकेश्वर, पंकज पवार-नाशिक या शिक्षकांना साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक राजेंद्र दिघे, मानपत्र वाचन खंडू मोरे आणि राजेंद्र उगले यांनी पसायदान सादर केले. सविता वैद्य यांनी सूत्रसंचालन केले. रतन पिंगट यांनी आभार मानले. युवा रंगावलीककार ॲड.दामिनी गांगुर्डे यांच्या आकर्षक रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी देवीदास भांगरे, देवीदास देशमुख, परशराम पाडवी, शिवाजी कोल्हे, संजय फतनानी, विश्वास सोनवणे, संजय देहाडे, मंदाकिनी शेलार, माधुरी पाटील, पूजा पवार, स्वामिनी पवार यांनी परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### सेवाभावी सुधा मूर्ती यांचे कार्य प्रेरणादायी : प्रशांत कुलकर्णी

**नाशिक ।** समाजातील प्रत्येक गरजूपर्यंत जाऊन दातृत्व जोपासणाऱ्या सुप्रसिद्ध साहित्यिका आणि ज्येष्ठ उद्योजिका सुधा मूर्ती यांचे समाजोपयोगी सेवाभावी कार्य आजही




सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन प्रशांत कुलकर्णी यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात १८०वे पुष्प गुंफताना 'सुधा मूर्ती' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक सुहास टिपरे होते. प्रशांत कुलकर्णी पुढे म्हणाले की, सुधा मूर्ती यांनी नेहमीच प्रेरणादायक कार्याची दिशा देऊन एक वेगळा आदर्श समाजासमोर उभा केला. शिक्षण, सेंद्रिय शेती, आयटी अशा विविध क्षेत्रांत भरीव योगदान दिले. संस्कारांची शिदोरी त्यांनी नव्या पिढीला दिली. सिद्धहस्त लेखिका म्हणून त्यांचा एक सरस पैलू आपल्याला प्रेरणा देणारा आहे. समाजसुधारणा, बालविवाह रोखणे, आधुनिक शेतीचा विकास, आरोग्य या क्षेत्रातही काम करणाऱ्या सुधाताईंना अनेक मानसन्मान लाभले. नम्रता हा महत्त्वाचा गुण त्यांनी आयुष्यभर जपला. यश-अपयश आपल्याला पचवता आलं पाहिजे; अशी शिकवण देणाऱ्या सुधा मूर्ती यांच्या जीवनकार्यावर त्यांनी प्रकाश टाकला. जयश्री राणे आणि अनिल वाघ यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर अजित कुलकर्णी यांनी आभार मानले.

### नाशिकला आज पत्रकारांसाठी कार्यशाळा

**नाशिक ।** नाशिक विभागीय अधिस्वीकृती समिती, जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक, एचपीटी आर्टस् व आरवायके सायन्स कॉलेज, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील पत्रकारांसाठी सोमवारी (दि. ८) सकाळी १०.३० वाजता एचपीटी आर्टस् व आरवायके सायन्स



कॉलेजच्या कुसुमाग्रज सभागृहात 'विकास पत्रकारिता कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत पत्रकारांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे. या कार्यशाळेस राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (माहिती/प्रशासन) हेमराज बागुल, नाशिक विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुधीर लंके, विभागीय माहिती कार्यालय, नाशिकचे उपसंचालक डॉ. किरण मोघे हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयप्रसाद अवस्थी हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रकाश कुलथे, नवनाथ दिघे, विभागीय अधिस्वीकृती समितीचे सदस्य अभिजित कुलकर्णी, किरण लोखंडे, विजय होलम, चंदन पुजाधिकारी उपस्थित राहतील. या कार्यशाळेस नाशिक जिल्ह्यातील माध्यम प्रतिनिधी, वृत्तपत्र व जनसंज्ञापन विभागाचे विद्यार्थी यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके आणि महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. प्रणव रत्नपारखी, उपप्राचार्य डॉ. प्रशांत देशपांडे यांनी केले आहे.

### मनेगाव विद्यालयाचे कबड्डी स्पर्धेत नेत्रदीपक यश

**नाशिक ।** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयद्वारे सिन्नर तालुकास्तरीय कबड्डी मुली स्पर्धा एस एल एम स्कूल सोनारी येथे संपन्न




झाल्या. सिन्नर तालुक्यातून 14 वर्षे आतील 36 संघांमधून नूतन जवाहर विद्यालय मनेगाव या विद्यालयाचा संघ याही वर्षी तालुक्यातून प्रथम क्रमांकाने विजेता झाला. लोकनेते शंकर बाळाजी वाजे विद्यालयात सिन्नर तालुकास्तर कबड्डी (मुले) संपन्न झाल्या. या स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलांचा संघ उपविजेता झाला. संघास विजेता चषक व रोख रक्कम बक्षीस मिळाले. जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल मविप्र सरचिटणीस नितीन ठाकरे, सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत यांनी खेळाडूंचे कौतुक केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती हांडगे, पर्यवेक्षक गांगुर्डे, शालेय स्कूल कमिटी अध्यक्ष नितीन शिंदे, त्र्यंबक सोनवणे सर्व सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दीपक गायकवाड, सुवर्णा गागरे, पोलिसपाटील बाळासाहेब पवार, मनेगावचे पोलीस पाटील रवींद्र सोनवणे, उर्मिला सोनवणे यांनी शुभेच्छा दिल्या.

## अक्षर ओळख ते जीवनाची ओळख देणारे शिक्षक हे दैवतच : डॉ. ढगे



**निफाड ।** भारतात प्राचीन काळापासून गुरूजनांना खूप महत्व आहे. आजच्या संगणक आणि तंत्रज्ञान युगातही विध्यार्थ्यांना अक्षर ओळख पासून ते जीवनाची ओळख करून देण्यात शिक्षकांचे मोठे योगदान आहे. त्यांना साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती, ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान या ज्ञानाच्या शाखांसह विविध क्षेत्रात हुशार करण्यासाठी शिक्षक सदैव तयार असतात. काळाची गरज ओळखून आजचा विद्यार्थी केवळ ज्ञानवंत आणि गुणवंत न होता तो एक आदर्श नागरीक होणे आवश्यक आहे. याची जाणीव शिक्षकांकडून करून दिली जाते. देशाचा आणि समाजाचा विकास करणारे आदर्श विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शामुळे घडत असतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी केले.

निफाड महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक दिन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा.अभय वडघुले, प्रा.पी.डी. आहेर, प्रा. एस. एस. कापसे, प्रा. चेतन कुंदे, प्रा. एस. एस. जाधव, प्रा. विद्या खैरनार, प्रा. आर. डी. जाधव, प्रा. प्रवीण शेलार, प्रा. मनिषा कोटकर, प्रा. शंकर गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक संजय गायकवाड आणि कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे पुढे म्हणाले की, विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीत जीवन जगत असो. त्याचा यशाचा पाया शिक्षक तयार करीत असतात. विध्यार्थ्यांच्या जीवनाची सुंदर रचना शिक्षक तयार करीत असतात. त्यामुळे आजही भारतीय संस्कृतीत शिक्षक सर्वांसाठी वंदनीय आहेत. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या रूपाने भारतीय संस्कृतीस आदर्श शिक्षक मिळाले. त्यामुळे विध्यार्थ्यांनी आपल्या जीवनाला आणि जगण्याला महत्व देणारे शिक्षकांचे कायम ऋणी असावे, असे मत व्यक्त केले. सुरूवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.प्रास्ताविकेत प्रज्ञा तांबे म्हणाली, आई वडील यांच्याबरोबर शिक्षक हेच मार्गदर्शन करीत असतात. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानामुळे विकास होत असतो. शिक्षकांच्या मदतीशिवाय विकास अशक्य आहे. त्यामुळे दिशा देणारे, आदर्श नागरीक व माणूस घडविण्या-या शिक्षकांचा सन्मान होणे आवश्यक आहे. शिक्षक दिनी विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे काम केले. पंचावन्न विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावत अध्यापन केले. नेहा म्हैसधुणे हिने प्राचार्य, तर वेदांत गचाले यांनी उपप्राचार्य म्हणून भूमिका बजावली. प्रा.पी.डी.आहेर, प्रा.वडघुले, प्रा रोशनी मोरे या प्राध्यापकांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार श्रद्धा राजोळे यांनी मानले. सूत्रसंचालन वैष्णवी म्हैसधुणे यांनी केले.

## नासाका विद्यालयात शिक्षक दिन साजरा




**नाशिकरोड ।** पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात थोर शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन 'शिक्षक दिन' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

माजी विद्यार्थी तेजस आडके, पालक तानाजी आडके, मुख्याध्यापक अरुण पगार यांच्या हस्ते आणि विद्यार्थी, शिक्षक-कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन करण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी वर्ग अध्यापनासह शालेय कामकाज उत्कृष्टपणे सांभाळले. शिक्षक दिनाच्या निमित्ताने मुख्याध्यापकपद सांभाळणारा विद्यार्थी पीयूष आडके याच्यासह ओम जाधव, विकास मोरे, भाग्यश्री मुठाळ, श्रावणी गायधनी यांनी अनुभवकथन आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यावर विचार व्यक्त केले. भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल विद्यालयाचे माजी विद्यार्थी तेजस आडके यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनीही मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक अरुण पगार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मौलिक विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या हस्ते सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. शिक्षक कैलास लहांगे यांनी सूत्रसंचालन केले.

## सामोडे येथे 'जनजाती गौरव वर्ष' अंतर्गत आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवनावर आधारित वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**पिंपळनेर ।** अनुदानित आश्रमशाळा सामोडे येथे क्रांतिकारक वीर भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त साजरा होणाऱ्या जनजाती गौरव वर्षाचे औचित्य साधून मराठी विभागातर्फे विभाग प्रमुख प्रा.राजेंद्र सोनवणे यांच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना "मला समजलेले आदिवासी क्रांतिकारक" हा स्पर्धेचा विषय देण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मनेष माळी,



तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक विभागाच्या जेष्ठ शिक्षिका छाया साखरे उपस्थित होत्या. सर्वप्रथम विर क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.शाळेतील शिक्षक शरद सुर्यवंशी यांनी जनजातीय गौरव वर्षाचे महत्व सांगत क्रांतिकारक वीरांच्या जीवनावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. प्रवीण पगारे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.विजय ठाकरे यांनी व आभार प्रदर्शन शिक्षक संदीप पवार यांनी केले.वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.वसंत गावीत,प्रा.पोर्णिमा भामरे, शिक्षिका चारुशीला पवार, शिक्षिका आशा लाडे यांनी काम पाहिले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. राजेंद्र सोनवणे, प्रा.गणेश भावसार, प्रा.भिकन पारधी, शिक्षक संदिप पवार व उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रयत्नशील होते.

### गणपती बघण्यासाठी निघालेल्या २८ वर्षीय तरुणाचा अपघातात मृत्यू...

**मनमाड ।** गणपती बघण्यासाठी घरून



निघालेल्या २८ वर्षीय तरुणाचा मनमाड-चांदवड रोडवरील असलेल्या गंगोत्री लॉन्स जवळ अपघात होऊन मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली होती.

शहरापासून जवळ असलेल्या शिंगवे येथील तुषार कानोबा खताळ वय २८ हा दुचाकी क्रं. एमएच-१५ ईक्यू-१९६९ या गाडीवरून शुक्रवारी रात्री गणपती बघण्यासाठी मनमाड येथील चौफुलीवर आला. मात्र मित्र मागेच राहिल्याने त्याला घेण्यासाठी पुन्हा माघारी जात असताना मनमाड-चांदवड रोडवरील गंगोत्री लॉन्स जवळ रस्त्यावर अंधारात धोकादायक स्थितीत टाटा कंपनीची गाडी क्रमांक एमएच-१८ बीझेड-२३१५ उभी होती. या लाईट बंद असलेल्या आणि भर रस्त्यात निष्काळजीपणे उभे केलेल्या ट्रकला दुचाकी वरील तुषार खताळ यांनी अंदाज न आल्याने धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातामध्ये तुषार खताळ या दुचाकीस्वाराला हातापायाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने जागीच त्याचा मृत्यू झाला. मनमाड पोलिस स्थानकात पोलीस कर्मचारी मयुरी शिवाजी पठारे यांनी फिर्याद दिली आहे.

## सप्तश्रृंगी कॅसल बी गणेशोत्सव मंडळाचा उत्साहात समारोप



**नाशिक ।** संपूर्ण परिसराला भक्ती व सांस्कृतिकतेची नवी ऊर्जा देणारा सप्तश्रृंगी कॅसल बी गणेशोत्सव मित्र मंडळाचा उत्सव यंदा सलग तिसऱ्या वर्षी अत्यंत उत्साह, श्रद्धा आणि सांस्कृतिक जल्लोषात पार पडला. समाजातील एकी, मैत्री आणि बंधुभाव दृढ करण्याच्या उद्देशाने मंडळाने आयोजित केलेल्या या उत्सवात विविध सांस्कृतिक, वैचारिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या दिवसांत पारंपरिक पूजाविधीबरोबरच भजन, कीर्तन, मुलांसाठी विविध स्पर्धा, महिलांसाठी सांस्कृतिक उपक्रम, तसेच युवकांसाठी प्रेरणादायी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. प्रत्येक कार्यक्रमाला मंडळातील सदस्य व सोसायटीतील रहिवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. "सर्वांचा सहभाग म्हणजेच उत्सवाची खरी ताकद" हे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले. उत्सवाच्या यशस्वी आयोजनामागे अध्यक्ष गणेश कांडेकर, उपाध्यक्ष मिलिंद देवरे आणि खजिनदार विनोद पवार यांचे काटेकोर नियोजन महत्त्वाचे ठरले. मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक विलास जाधव व प्रभाकर घैसास यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याने कार्यक्रम अधिक शिस्तबद्ध व समृद्ध झाला. तसेच सोसायटीचे चेअरमन संतोष उशीर, मुकुंद सप्रे व संजय गिरासे संपूर्ण सोसायटी परिवाराने परस्पर सहकार्याने उत्सवाची जबाबदारी पार पाडली. या एकोप्यामुळे गणेशोत्सवाचे वातावरण अधिकच मंगलमय झाले. उत्सवाच्या अखेरीस पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल-ताशांच्या दणदणाटात आणि "गणपती बाप्पा मोरया"च्या जयघोषात गणरायांचा निरोप घेण्यात आला. वातावरणात दुणावलेल्या आनंद, भक्ती व उत्साहाने खुटवड नगर परिसरात गणेशोत्सवाची सुंदर आठवण सर्वांच्या मनावर बिंबवली.

## अशोकाच्या खेळाडूंची मैदानी क्रीडा स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**नाशिक ।** मुंबईतील प्रियदर्शनी पार्क येथे नुकत्याच पार पडलेल्या आय. सी. एस. ई. राज्यस्तरीय मैदान क्रीडा अजिंक्यपद स्पर्धेत नाशिकच्या अशोका युनिव्हर्सल स्कूलच्या खेळाडूंनी दणदणीत कामगिरी करत एकूण सात सुवर्णपदकासह अनेक पदके जिंकून राज्य पातळीवर नाशिकचे नाव उज्ज्वल केले.

धावणे, लांबउडी आणि उंच उडी तसेच गोळा फेक प्रकारांमध्ये खेळाडूंनी वर्चस्व गाजवले. १४ वर्षातील मुलीमध्ये जान्हवी



पाटोळेने ८० मीटर हर्डल्समध्ये १३.०३ सेकंदात ही धाव पूर्ण करत नवीन विक्रम प्रस्थापित केला आणि सुवर्णपदक पटकावले. आपल्या विजयाची हीच लय कायम राखत जान्हवीने लांब उडीमध्ये कांस्यपदक जिंकले. याच गटात ईश्वरी खैरे हीने लांबउडी द्वितीय क्रमांक आणि ८० मीटर हर्डल्स प्रकारात तृतीय क्रमांक पटकावत दुहेरी यश मिळविले. देवांशी काळे हीने २०० मीटर धावणे, ४०० मीटर आणि ६०० मीटर धावणे या तीनही स्पर्धेमध्ये कांस्यपदकाची कमाई केली.

१७ वर्षे मुलीच्या गटामध्ये गौतमी पुस्तके हीने ८०० मीटर, १५०० मीटर आणि ३००० मीटर धावणे शर्यतीत द्वितीय क्रमांक मिळवला. याच गटात सिद्धी बिजरानिया हीने ३ किलो मीटर चालणे या प्रकारात हे अंतर १७.२९ मिनिटांचा गाठून विक्रम नोंदवत सुवर्णपदक मिळविले. तसेच १५०० मीटर धावणे प्रकारात द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षे मुलांच्या गटात अर्चित मानकर याने ८०० मीटर, १५०० मीटर आणि ३००० मीटर या मध्यम पल्याच्या शर्यतीत आपली संपूर्ण छाप सोडत या तीनही शर्यतीत सुवर्णपदके पटकावत आपले वर्चस्व सिद्ध केले.

## नाशिक गणेश दर्शन...




यामिनी मोरे



कुणाल सोनवणे



मनस्वी सोनवणे

# बालांगण



## सोडा 'बिंजे इटिंग'

मुलांनो, 'बिंजे इटिंग' म्हणजे उगाचच खात राहणं. 'बिंजे इटिंग' हा एक आजार आहे. पोटभर खाणं गरजेचं असतं. पण पोट भरल्यानंतरही खावंसं वाटलं तर ते बिंजे इटिंगचं लक्षण असू शकतं. आता या बिंजे इटिंगची समस्या सोडवण्यासाठी काही उपाय करता येतील. चला तर मग याबाबत माहिती घेऊ.

थोड्या वेळानंतर खाण्यासाठी अन्न लपवून किंवा साठवून ठेवणं, पोट भरलेलं असतानाही खात राहणं, जेवणाच्या ठरलेल्या वेळा नसणं, दिवसभर चरत बसणं, सगळ्यांसमोर नेहमीप्रमाणे खाणं पण एकटं असताना भरपूर आणि बकाबक खाणं, खाणं थांबवता न येणं, खूप कमी वेळात भरपूर खाणं ही बिंजे इटिंगची लक्षणं आहेत.

ही समस्या सोडवण्यासाठी खाण्याचा मोह टाळायला हवा. म्हणजे बघा, आपल्याला वेफर्स, पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राईज, चॉकलेट, केक असं जंक फूड आवडतं. हेच पदार्थ जास्त खाल्ले जातात. त्यामुळे हे पदार्थ खाण्यावर नियंत्रण ठेवायला हवं. अन्नाशी तुमचं नातं निर्माण व्हायला हवं. अन्न आरोग्यासाठी गरजेचं आहे हे लक्षात ठेवा. आपल्या भावनिक गरजा पूर्ण करण्यासाठी खाऊ नका. शरीराला पोषक घटक मिळवून देण्यासाठी खायला हवं हे नेहमी लक्षात ठेवा.


हेल्थवेल्थ

दोस्तांनो, भूक फक्त शारीरिक नसते तर ती भावनिकही असते. म्हणजे आपल्याला उगाचच खावंसं वाटतं. नुकतंच जेवण झाल्यानंतरही गोड खावंसं वाटतं. पण शरीराला या खाण्याची गरज नसते. त्यामुळे गोड खावंसं वाटलं तरी ते टाळायला हवं. अजिबात उपाशी राहू नका. उपाशी राहिल्यामुळे जास्त खाल्लं जातं. खाण्यापिण्याच्या वेळा ठरवा. त्याच वेळी खा. खाण्याच्या वेळा टाळल्यामुळे जंक फूड खावंसं वाटतं. आहारात पोषक पदार्थांचा समावेश करा. फळं, सुकामेवा असे आरोग्यदायी पदार्थ खा.

## जपानचं वेगळेपण

जपान हा देश ६८०० लहान लहान बेटांपासून बनलेला आहे. इथले लोक अत्यंत मेहनती म्हणून ओळखले जातात. जपानला उगवत्या सूर्याचा देश म्हटलं जातं. जपानमध्ये दरवर्षी सुमारे ४००० भूकंप होतात. म्हणजे प्रत्येक दिवशी इथं ४ भूकंप होतात. एवढे भूकंप होत असूनही जपांची अर्थव्यवस्था अत्यंत बळकट आहे. जपानचं वैशिष्ट्य म्हणजे मुलं दहा वर्षाची होईपर्यंत त्यांना इथं कोणतीही परीक्षा द्यावी लागत नाही. इथं शाळेत आल्यावर मुलं आणि शिक्षक एकत्र येऊन आपापले वर्ग स्वच्छ करतात. जपानच्या लोकांचं जगण्याचं सरासरी वय ८२ वर्ष आहे. संपूर्ण जगात हे वय सर्वात जास्त मानलं जातं. जपानमध्ये १०० वर्षापेक्षा जास्त वय असणारे ५०००० पेक्षा जास्त लोक आहेत. सुमो हा जपानचा अतिशय लोकप्रिय खेळ आहे. त्याखालोखाल जपानी लोकांना बेसबॉल हा खेळ आवडतो. जपानमध्ये नवीन वर्षाचा उत्सव साजरा करताना तिथल्या मंदिरांमध्ये १०८ घंटा वाजवल्या जातात. काळी मांजर जपानमध्ये लकी समजली जाते. जपानमध्ये ५५ लाख व्हेंडिंग मशीन्स आहेत आणि त्यातून केळी , नूडल्स आणि अंडी पुरवली जातात. जपान हा जगातला एकमेव देश आहे की ज्यावर अणुबॉम्ब टाकला गेला. हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर लिटिल बॉय आणि फॅट मॅन हे अणुबॉम्ब टाकण्यात आले होते. पण त्या धक्क्यातून सावरून जपान आज अत्यंत प्रगत देश म्हणून ठामपणे उभा आहे.

सफर देशांची



## आकाशाचा डोळा: ड्रोन कॅमेरा

ड्रोन म्हणजे यूएवी म्हणजेच अनमॅनड एरियल व्हेईकल. ड्रोनला उडता रोबोट असंही म्हणता येईल. आपण हा रोबोट रिमोट कंट्रोलद्वारे नियंत्रित करू शकतो. ज्या ठिकाणी माणूस पोचणे अवघड आहे त्या ठिकाणी ड्रोन सेट केला जातो. क्वाडकोप्टर हे ड्रोनचं अगदी प्राथमिक स्वरूपाचं डिझाईन आहे. १९२० साली ह्या प्रकारचा ड्रोन सर्वात प्रथम उडवण्यात आला.बदलत्या टेक्नॉलॉजीमुळे यात अनेक सुधारणा झाल्या. सेन्सर आणि कॅमेरा मध्ये सुधारणा होत गेली. ड्रोनची बॅटरी आणि त्याचं वजन यावर त्याचं आकाशात उडत राहणं अवलंबून असतं. ड्रोन हेलिकॉप्टरसारखा हवेत उडवला जातो आणि रिमोटने नियंत्रित केला जातो. त्याच्या कॅमेरामुळे जमिनीवरच्या दृश्यांचे शूटिंग स्पष्ट आणि नीट केले जाते. अनेक रिसर्च आणि



रेस्क्यू ऑपरेशनमध्ये ड्रोनचा वापर केला जातो. ट्रॅफिक नियंत्रित करण्यासाठी, हवामानाचा अंदाज घेण्यासाठी ड्रोनचा उपयोग केला जातो. आकाशातून फोटोग्राफी करण्यासाठी तसंच खेळाच्या सामन्यांचं प्रक्षेपण करण्यासाठीदेखील ड्रोनचा वापर केला जातो. अलीकडे शेतीच्या विविध कामांमध्ये ड्रोनचा उपयोग केला जाऊ लागला आहे.

जाणून घ्या

मिलिटरीमध्ये ड्रोनचा वापर दिवसेंदिवस वाढू लागला आहे. हेरगिरीसाठी वापरण्यात येणारे ड्रोनआजच्या जगातले सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे. हवाई दलाच्या गोरगोन सेन्सर असलेले रीपर प्रकारचे ड्रोन १२ कोनांमधून चार किलोमीटर क्षेत्रावर लक्ष ठेवते. तर पेंटोगोनच्या एका संस्थेतर्फे विकसित केलेली आरगस इमेजिंग सिस्टीम वीसहजार फूट उंचीवरून सहा इंचाच्या वस्तूचेसुद्धा फोटो काढू शकतात. ड्रोन हे नव्या युगाचे नवे तंत्रज्ञान जर योग्य रीतीने वापरले गेले तर वरदान ठरेल यात काही शंका नाही. नुकत्याच पाकिस्तानवर केलेल्या कारवाईत भारतीय हवाई दलाच्या ड्रोन्सने महत्वाची कामगिरी बजावली हे तर तुम्हाला माहीत आहेच.




### ओळखा पाहू

जिज्ञासा

१)छत्तीसगड राज्याचा प्रसिद्ध नृत्यप्रकार कोणता?
२) उरूग्वेचं चलन कोणतं?
३) मंगोलियाची राजधानी कोणती?
४) २०२२ चा फुटबॉल विश्वचषक कोणत्या देशात आयोजित करण्यात आला होता?
५) हल्दिया बंदर कोणत्या राज्यात आहे?
६) पुलित्झर पारितोषिक कोणत्या देशातर्फे दिलं जातं?
७) ईझार चषक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
८) रणजी करंडक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
९) भारतातली पहिली महिला बँक कोणती?
१०) सार्वजनिक ठिकाणी वायफाय सुविधा उपलब्ध करून देणारं भारतातलं पहिलं शहर कोणतं?

उत्तर : १) राउत नाचा २) पेसो ३) उलानबाटर ४) कतार ५) पश्चिम बंगाल ६) अमेरिका ७) पोलो ८)क्रिकेट ९) भारतीय महिला बँक १०) मुंबई



## आधुनिक काळातलं ऑफिस मॅनेजमेंट

दोस्तांनो, उद्योग-व्यवसायाच्या पद्धती बदलल्या आहेत. सगळं कसं आधुनिक झालं आहे. आजघडीला उद्योजक तंत्रज्ञानाची मदत घेतात. म्हणूनच आधुनिक कार्यालयाचं म्हणजे ऑफिसचं व्यवस्थापन हे किचकट काम होऊन बसलं आहे. ऑफिसचं व्यवस्थापन आता सोपं राहिलेलं नाही. एक व्यवस्थापक कंपनी आणि ग्राहकांमधला दुवा बनतो. तुम्हीही आधुनिक ऑफिस मॅनेजमेंटच्या क्षेत्रात करिअर करू शकता. या क्षेत्राबद्दलचं हे मार्गदर्शन...

- 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट अँड सेक्रेटरियल प्रॅक्टिस'सारखे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पुढे जाऊ शकता. यासोबतच 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट', 'मॉडर्न ऑफिस प्रॅक्टिस' या विषयांमध्ये डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. बारावीनंतर या अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. पदवी पूर्ण करण्याआधीही तुम्ही हे अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. पदवी पूर्ण केल्यानंतर 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट' हा विषय घेऊन एमबीएही करता येतं.
- या क्षेत्रात येण्यासाठी तुमच्याकडे संवादकौशल्य आणि चटपटीतपणा असायला हवा. इंग्रजीसह हिंदी आणि स्थानिक भाषेवर प्रभुत्व असल्यास लाभ होऊ शकतो. हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर छोट्या कंपनीपासून सुरूवात करता येईल. अनुभव मिळाल्यानंतर मोठ्या, बहुराष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी मिळू शकते.
- जनरल किंवा असिस्टंट मॅनेजरच्या पदापासून या क्षेत्रातल्या करिअरला सुरूवात करता येते. पुढे 'एक्झिक्युटिव्ह असिस्टंट' म्हणूनही तुम्ही काम करू शकता.

कोण होणार?

## पहिलावाहिला टेक्स्ट मेसेज

दोस्तांनो, मोबाईल क्रांतीमुळे टेक्स्ट मेसेज सर्रास पाठवले जातात. या संदेशांचं काहीच अप्रूप राहिलेलं नाही. पण कधीतरी पहिला टेक्स्ट मेसेज पाठवण्यात आला होता. त्यावेळी या मेसेजबद्दल प्रचंड कुतुहल असणार हे नक्की! चला तर मग या पहिल्या टेक्स्ट मेसेजविषयी जाणून घेऊ.




पहिलावाहिला टेक्स्ट मेसेज २७ वर्षांपूर्वी म्हणजे १९९२ मध्ये पाठवण्यात आला होता. ३ डिसेंबर १९९२ या दिवशी हा मेसेज पाठवण्यात आला. त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या विचार केला तर टेक्स्ट मेसेजने २७ वर्षं पूर्ण केली आहेत. इंग्लंडमधल्या एका इंजिनिअरने 'मेरी ख्रिसमस' हा संदेश पाठवला होता. नील पॅपवर्थ असं या इंजिनिअरचं नाव. त्याने हा मेसेज रिचर्ड जार्व्हिस यांच्या मोबाईलवर पाठवला. जार्व्हिस हे त्यावेळी व्होडाफोन यूकेचे अध्यक्ष होते.


जाणून घ्या

आज आपल्या मोबाईलला की बोर्ड असतो. पण त्यावेळी या की बोर्डचा शोध लागला नव्हता. म्हणजे त्यावेळी मोबाईलला की बोर्ड नसायचा. त्यामुळे पॅपवर्थने कॉम्प्युटरवर हा मेसेज टाईप केला. रिचर्ड ख्रिसमस पार्टीला गेले असताना त्यांच्या मोबाईलवर हा संदेश झळकला. आज आपण अगदी सहज मेसेज पाठवू शकतो. ९० सेकंद म्हणजे दीड मिनिटांमध्ये मेसेजला प्रतिसाद दिला जातो पण २७ वर्षांपूर्वी मेसेज पाठवणं सोपं नव्हतं हेच खरं!

## हिऱ्यांची राजधानी सुरत

दोस्तांनो, सुरत हे गुजरात राज्यातलं प्रमुख शहर आहे. सुरत हे हिरे व्यापाराचं केंद्र बनून गेलं आहे. इथे कापड उद्योगही मोठ्या प्रमाणावर आहे. सुरतला 'हिऱ्यांची राजधानी' असं म्हटलं जातं. जवळपास ९५ टक्के हिऱ्यांना सुरतमध्येच पैलू पाडले जातात. सुरत हे देशातलं आठव्या क्रमांकाचं सर्वात मोठं शहर आहे. या शहराची लोकसंख्या ४५ लाखांच्या घरात आहे. सुरतमध्ये सर्वाधिक पूल आहेत. म्हणूनच सुरतला उड्डाणपूल म्हणजेच फ्लायओव्हर्सचं शहर असंही म्हटलं जातं.

सुरतमधून कापडाची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते. लग्नप्रसंगी सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या कापडाची निर्मिती सुरतमध्येच होते. इथे कापडाची खूप मोठी बाजारपेठ आहे. जिलबी, फाफडा, थेपला, ढोकळा, सुरती उंदियो, बटाटा पुरी हे खाद्यपदार्थ सुरतची ओळख आहे. सुरतमध्ये कापड गिरण्या आहेत. तसंच इथलं रेशीमही खूप प्रसिद्ध आहे. सुरत शहरात समुद्रकिनारेही आहेत. दुमास, दांडी आणि सुवाली हे इथले प्रसिद्ध समुद्रकिनारे आहेत. दुमास समुद्रकिनाऱ्यावरची वाळू काळ्या रंगाची आहे.



सफर शहरांची

## यम्मी फ्रूट कस्टर्ड


छोट्या दोस्तांनो, घरात सगळ्यांना आवडेल आणि करायला एकदम सोपा असा पदार्थ म्हणजे फ्रूट कस्टर्ड.

**साहित्य** : कस्टर्ड पावडर, १ लीटर दूध, साखर , फळं . सफरचंद, डाळिंब, द्राक्ष, चिक्कू आणि तुमच्या आवडीची फळं घेऊ शकता.

**कृती** : सर्व फळं साली आणि बिया काढून चिरून घ्या. गार होण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवा. एक वाटी दुधात कस्टर्ड पावडर मिसळून घ्या अगदी एकजीव होऊ द्या. नंतर उरलेलं दूध तापवा. चांगलं उकळू द्या. मग कस्टर्ड मिसळलेलं दूध गरम दुधात घालून तापवत रहा. गॅस बंद करा. दूध गार झाले की फ्रिजमध्ये ठेवा. ३ ते ४ तासांनी दूध थंड झाले की चिरलेली फळं त्यात मिक्स करा. आरोग्यदायी आणि स्वादिष्ट फ्रूट कस्टर्ड तयार.

रात्री घरातले सगळे गप्पा मारत बसले की मस्तपैकी बाउलमध्ये घालून सगळ्यांना सर्व्ह करा.

खादाडी



ठिपके जुळवा



दोस्त हे मस्त

### पांढरा हत्ती



मुलांनो, पांढरा शुभ्र हत्ती असतो. या हत्तीला 'अल्बिनो' असंही म्हणतात. पांढरा हत्ती ही दुर्मिळ प्रजाती आहे. त्यांची संख्या खूप कमी आहे. थायलंडमध्ये पांढरे हत्ती मोठ्या संख्येने आढळतात. म्हणून या देशाला 'पांढऱ्या हत्तींची भूमी' असं म्हटलं जातं. या हत्तींच्या त्वचेचा रंग लांबून पांढरा शुभ्र दिसत असला तरी त्याला लालसर राखाडी झाक असते. हे हत्ती भिजल्यावर त्यांची त्वचा गुलाबी रंगाची दिसू लागते. हत्ती हा बौद्ध धर्माचं प्रतीक मानला जातो. या हत्तींचा वापर राजेशाही समारंभांमध्ये केला जातो.

खादाडी

### चॉकलेट कॅरॅमल्स



चॉकलेट कोणाला आवडत नाही.चॉकलेटपासून मस्तपैकी 'चॉकलेट कॅरॅमल' हा पदार्थ तयार करता येईल. यासाठी एक चमचा बटर, एक कप साखर, पाऊण कप कॉर्न सिरप, चॉकलेटचे तुकडे (हे चॉकलेट गोड नसावं) दीड कप क्रीम हे साहित्य घ्या. एक ॲल्युमिनियम फॉईल घ्या. ही फॉईल पॅनवर पसरा. त्यावर बटर लावा आणि थोडा वेळ बाजूला ठेवा. आता एका सॉसपॅनमध्ये साखर, कॉर्न सीरप आणि चॉकलेट घाला. हे सगळं मिश्रण उकळा. यात अर्धा कप क्रीम घालून शिजवून घ्या. हे मिश्रण सतत हलवत रहा. आता त्यात अर्धा कप क्रीम घाला. आता हे सर्व मिश्रण ॲल्युमिनियम फॉईल लावलेल्या पॅनमध्ये घाला. साधारण पाच तास किंवा रात्रभर थांबा. आता चॉकलेट कॅरॅमल तयार आहे. या चॉकलेटच्या छोट्या वड्या करा. मित्रमैत्रिणींना खायला द्या.

स्टडी टिप्स

### मित्रमैत्रिणींसोबत सोडवा गणितं


मुलांनो, गणिताची भीती वाटत असेल तर काळजी करू नका. गणिताची आवड असणाऱ्या मित्रमैत्रिणींसोबत अभ्यास करा. एकत्र गणितं सोडवल्याने तुमची भीती कमी होईल. आपणही गणितं सोडवू शकतो, हा आत्मविश्वास मिळेल. गणिताची भीती घालवण्याचा हा खूप चांगला उपाय आहे. मित्रमैत्रिणींसोबत अभ्यास करताना तुम्हाला मजाही येईल आणि गणितंही झटपट सुटतील.



योगा टाईम

### पोटाच्या समस्या सोडवणारं उत्तान पादासन

दोस्तांनो, अधूनमधून तुमचं पोट दुखतं का, अपचनामुळे खूप त्रास होतो का, पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी काही योगासनं करता येतील. उत्तान पादासन हे असंच एक योगासन आहे. या आसनामुळे पोटाला आराम मिळतो. पचनसंस्थेचं कार्य सुधारतं. यामुळे अन्न लवकर पचतं.



# अमेरिकन टॅरिफचा एलॉन मस्क यांच्या ‘X’कडून ढोंग म्हणून उल्लेख



**वॉशिंग्टन, दि. ७ वृत्तसंस्था**

रशियन तेल खरेदीवरून भारत आणि अमेरिकेत सुरू असलेल्या टॅरिफ तणावादरम्यान, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे व्यापार सल्लागार पीटर नवारो हे सतत हास्यास्पद विधाने करत आहेत. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर अशीच एक हास्यास्पद पोस्ट केली होती. यानंतर एक्सने त्यांचे दावे खोटे असल्याचे सर्वांसमोर उघड केले आणि त्याचे फॅक्ट चेकिंग केले. आता, जगासमोर खोटे असल्याचे सिद्ध झाल्यानंतर, नवारो यांनी आपली चूक सुधारण्याऐवजी, एक्सचे मालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी एलॉन मस्क यांच्यावर संताप व्यक्त केला आहे.

अमेरिकन वृत्तपत्र वॉशिंग्टन पोस्टने एक लेख प्रकाशित केला आहे ज्यामध्ये असे म्हटले आहे की ट्रम्प सरकार भारताशी संबंध सुधारण्यासाठी परस्परविरोधी प्रयत्न करत आहे. वॉशिंग्टन पोस्टच्या या बातमीत असा दावा करण्यात आला आहे की, अमेरिकेने भारताबद्दल वापरलेल्या चिथावणीखोर भाषेमुळे दोन्ही देशांतील संबंध अधिक कटू होत चालले आहेत.

या बातमीवर टीका करताना, पीटर नवारो यांनी एक्सवर पोस्ट केली की, “फॅक्ट: भारत सर्वाधिक टॅरिफ लादतो ज्यामुळे अमेरिकेचे रोजगार कमी होतात. भारत केवळ नफा मिळवण्यासाठी रशियन तेल खरेदी करतो ज्यामुळे रशियाच्या युद्धयंत्रणेला चालना मिळते. यामुळे युक्रेनियन आणि रशियन नागरिक मरत आहेत. अमेरिकन करदाते जास्त पैसे देतात. भारत सत्य हाताळू शकत नाही. वॉशिंग्टन पोस्ट अमेरिकन डाव्या विचारसरणीच्या बनावट बातम्या चालवते.”

नवारो यांच्या या पोस्टवर, एक्सने एका कम्युनिटी नोटसह फॅक्ट चेकिंग केली आणि लिहिले, “भारत रशियाकडून केवळ नफा कमावण्यासाठी नाही तर ऊर्जा सुरक्षेसाठी तेल खरेदी करतो. ते व्यापार निर्बंधांचे उल्लंघन करत नाही. जरी भारतावर टॅरिफ असले तरी, त्यांचा अमेरिकेसोबत मोठा व्यापार आहे. अमेरिका स्वतः रशियाकडून काही वस्तू आयात करत आहे, हे एक प्रकारचे ढोंग आहे.”

एक्सवरील या कम्युनिटी नोटला “मूर्खपणा” म्हणत, नवारो यांनी एलॉन मस्क यांच्यावर “प्रपोगांडा” परवण्यासाठी परवानगी दिल्याचा आरोप केला. भारत केवळ नफा कमविण्यासाठी रशियाकडून तेल खरेदी करत आहे या त्यांच्या खोट्या दाव्याचा त्यांनी पुन्हा पुनरुच्चार केला.

# काशी विश्वनाथ मंदिराच्या पुजाऱ्यांना मिळणार 200 टक्के पगारवाढ

**वाराणसी, दि. ७ वृत्तसंस्था**

एक ऐतिहासिक निर्णय घेत, उत्तर प्रदेश सरकारने श्री काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टच्या पुजारी आणि कर्मचाऱ्यांसाठी नवीन सेवा नियमांना मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार, त्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळेल आणि त्यांच्या पगारातही लक्षणीय वाढ होईल. पुजाऱ्यांचे मासिक वेतन, जे आतापर्यंत सुमारे ३० हजार रुपये, ते आता नवीन नियमांनुसार जवळजवळ तिप्पट होईल. गेल्या चार दशकांतील पुजाऱ्यांच्या सेवा नियमांत ही पहिली मोठी सुधारणा आहे.



नुकत्याच पार पडलेल्या १०८ व्या बैठकीत, श्री काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टने इतर अनेक प्रस्तावांना मान्यता दिली. यामध्ये पारंपारिक शिक्षणाला चालना देण्यासाठी मिर्झापूरमधील काक्राही येथे मंदिराच्या ४६ एकर जमिनीवर वैदिक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे याचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांचा प्रवास सुलभ करण्यासाठी काशी विश्वनाथ धाम आणि शक्तीपीठ विशालाक्षी माता मंदिर दरम्यान थेट मार्ग तयार करण्यासाठी इमारती खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. धाममध्ये सुरक्षा उपाययोजना मजबूत करण्यासाठी एक प्रगत नियंत्रण कक्ष आणि आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

१९८३ मध्ये राज्य सरकारने मंदिराचे प्रशासन ताब्यात घेतले, परंतु आतापर्यंत पुजारी आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा परिस्थितीत कोणतीही लक्षणीय सुधारणा झालेली नाव्हती. या बदलामुळे मंदिर कर्मचाऱ्यांना उत्तर प्रदेशातील इतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने अतिरिक्त फायदे मिळतील. समानता आणि आदराच्या त्यांच्या दीर्घकालीन मागणीला मान्यता म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे. पण, भारतातील बहुतेक राज्यांमध्ये हिंदू पुजाऱ्यांना सरकारी कर्मचारी मानले जात नाही, तेलंगणा हा अपवाद आहे.

काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्व भूषण मिश्रा यांनी एएनआयला सांगितले की, “मंदिराचे पुजारी पूर्वी कोणत्याही औपचारिक चौकटीशिवाय काम करत होते. आमच्या पुजाऱ्यांना पूर्वी कोणतेही सेवा नियम नव्हते. आता नियमांसह कराराला ट्रस्टने मान्यता दिली आहे. जर सरकारने सहमती दर्शवली, तर जे पुजारी हे स्वीकारून यावर स्वाक्षरी करतील त्यांना सुधारित सेवा आणि लाभ मिळतील. भारतातील मंदिरांमध्ये काम करणाऱ्या पुजाऱ्यांसाठी अनुक्रमे सर्वोत्तम वेतन आणि लाभ देणे हे उद्दिष्ट आहे.”

# मुनीर जनतेवर अत्याचार करताय, पाकिस्तानात अघोषित मार्शल लॉ- इम्रान खान



**इस्लामाबाद, दि. ७ वृत्तसंस्था**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. इम्रान खान म्हणाले की “मुनीर हे पाकिस्तानी जनतेवर अत्याचार करत आहेत. अत्याचार करून ते सगळं काही नियंत्रणात ठेवू पाहत आहेत जेणेकरून ते दीर्घकाळ त्यांची सत्ता टिकवू शकतील आणि त्यांची राजवट चालवू शकतील. यावेळी पाकिस्तानात अघोषित मार्शल लॉ लागू करण्यात आला आहे.”

पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू आणि माजी पंतप्रधान इम्रान खान हे सध्या तुरुंगात आहेत. जेलमधूनच त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध केलं आहे ज्यात त्यांनी असीम मुनीर यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, “२०२४ च्या निवडणुकीत हेराफेरी करून शाहबाज शरीफ यांचं सरकार स्थापन करण्यात आलं. आता असीम मुनीर यांच्या इशाऱ्यांवर सरकार शरीफ यांच्याच कार्यकर्त्यांवर अत्याचार करत आहे.”

इम्रान खान यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की “असीम मुनीर हे त्यांची त्यांची राजवट टिकवून ठेण्यासाठी पाकिस्तानच्या जनतेवर अन्याय करत आहेत, त्यामुळे देश कमकुवत होत आहे. ज्यांनी (मुनीर अँड कंपनीने) जनादेश चोरला आहे ते आता काहीसे घाबरले आहेत. याच भीतीमुळे आमच्यावरील अत्याचार वाढत आहेत.”

“मला आणि माझी पत्नी बुशरा बीबी यांना ‘एकांत कारावासात’ ठेवून हे लोक माझं मानसिक खच्चीकरण करू पाहत आहेत. मी कोलमडून पडावं असं त्यांना वाटतं. मी माझे विचार सोडावे आणि जनतेचा आवाज दबला जावा असं त्यांना वाटतं.”

# पंतप्रधान मोदींचे आधी ट्रम्प यांना उत्तर

## आता फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांशी फोनवरून केली चर्चा

**नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था**

डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने भारतीय मालावर लादलेल्या ५० टक्के टॅरिफच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि भारत यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. यादरम्यान ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींशी माझी मैत्री कायम राहिल, ते एक महान पंतप्रधान आहेत, अशी प्रतिक्रिया शुक्रवारी दिली होती. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील ट्रम्प यांना उत्तर दिले आहे. मोदी आणि ट्रम्प यांच्यातील संवादानंतर काही तासांतच आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी फोनवरून दीर्घ चर्चा केल्याची बाब समोर आली आहे. यावेळी या नेत्यांमध्ये दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यासाठी काम करण्याबद्दल विचारांची देवाणघेवाण झाली.



पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी झालेल्या फोन संभाषणाबद्दल माहिती दिली आहे. एकीकडे रशिया आणि युक्रेनमध्ये गेल्या साडेतीन वर्षांपासून युद्ध सुरू आहे, तर दुसरीकडे भारत आणि अमेरिकेत टॅरिफ आणि ट्रेडच्या मुद्द्यावर तणावाची परिस्थिती आहे, या पार्श्वभूमीवर दोन देशांच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेला विशेष महत्त्व आहे.

पंतप्रधान मोदींनी त्यांच्या एक्स हँडलवर केलेल्या पोस्टमध्ये माहिती दिली की, “राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्याबरोबर खूप चांगली चर्चा झाली. आम्ही विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि त्याचे सकारात्मक मूल्यांकन केले. युक्रेनमधील संघर्ष लवकर संपवण्याच्या प्रयत्नांसह आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्यांवर विचारांची देवाणघेवाण केली. जागतिक शांतता आणि स्थिरता वाढवण्यात भारत-फ्रान्स यांच्यातील धोरणात्मक भागीदारी महत्त्वाची भूमिका बजावत राहील.”

# गुजरातच्या पावागडमध्ये रोपवे कोसळून सहा जणांचा मृत्यू

**पावागड, दि. ७ वृत्तसंस्था**

गुजरातच्या पंचमहाल जिल्ह्यातील प्रसिद्ध शक्तीपीठ पावागडमध्ये शनिवारी (६ सप्टेंबर) दुपारी मोठी दुर्घटना घडली आहे. येथील मालवाहू रोपवे कोसळून मोठी जीवित व वित्तहानी झाली आहे. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दोन लिफ्टमॅन, दोन मजूर आणि इतर दोन जणांचा समावेश आहे. पंचमहालच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या दुर्घटनेची आणि यात जीवितहानी झाल्याची पुष्टी केली आहे. दुपारी ३.३० च्या दरम्यान ही दुर्घटना झाल्याचं सांगितलं जात आहे. रोपवेची मुख्य तार तुटल्याने ही दुर्घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस व अग्निशमन दलाची पथकं घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर त्यांनी बचावकार्य सुरू केलं. या दुर्घटनेनंतर



आसपासच्या परिसरातील लोकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. सध्या पोलीस व जिल्हा प्रशासनाचे अधिकारी या घटनेचा तपास करत आहेत आणि दुर्घटनेचं कारण जाणून घेत आहेत. अद्याप प्रशासनाने दुर्घटनेचं कारण सांगितलेलं नसलं तरी रोपवेची मुख्य तार तुटल्याने ही घटना घडल्याचं सांगितलं जात आहे.

# जय अंबे सुपरमार्केट्सचा आयपीओ १० सप्टेंबर २०२५ रोजी उघडणार

जय अंबे सुपरमार्केट्स लिमिटेडने बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर लिस्टिंगसाठी १० सप्टेंबर २०२५ रोजी इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) सार्वजनिक करण्याची योजना जाहीर केली आहे. हा एकूण इश्यू साईज २३,६४,८०० इक्विटी शेअर्सचा १,८४४.५४ लाखांपर्यंतचा आहे. आयपीओची किंमत बँड-रु.७४/- ते रु.७८/- प्रति शेअर असेल.तर

दर्शनी मूल्य-रु. १० प्रति शेअर असेल. लॉट साईज १६०० इक्विटी शेअर्स इतकी असेल. जय आंबे कंपनी गुजरातमधील १७ सुपरमार्केटद्वारे एफएमसीजी उत्पादने, किराणा, गृह वस्त्रोद्योग, गृह सजावट, कपडे किंवा पोशाख, खेळणी, भेटवस्तू, पादत्राणे आणि घरासाठी वापरल्या जाणाऱ्या



वस्तूंच्या व्यापारात गुंतलेली आहे. सिटी स्क्वेअर मार्ट हा जय अंबे सुपरमार्केट्स लिमिटेड कंपनीच्या मालकीचा ब्रँड आहे. कंपनी फ्रँचायझी मॉडेलद्वारे रिटेल मार्ट्सचा व्यवसाय देखील करते. कंपनीने ऑगस्ट २०१८ मध्ये कुडासन, गांधीनगर येथे पहिल्या स्टोअरसह आपला प्रवास सुरू केला आणि ६ वर्षांत कंपनीने गुजरातमधील १७ स्टोअरमध्ये विस्तार केला. सर्वोत्तम दर्जाची सेवा, विस्तृत उत्पादन श्रेणी आणि वाजवी किमती देऊन कंपनी वेगाने वाढली आहे.श्री. जिग्नेश पटेल, एमडी, जय अंबे सुपरमार्केट लिमिटेड, म्हणाले, "आम्हाला बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर आमचा आगामी आयपीओ जाहीर करताना आनंद होत आहे. आम्ही आमच्या ग्राहकांना दर्जेदार उत्पादने आणि अपवादात्मक सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही आमच्या ऑपरेशन्सची वाढ आणि विस्तार करत राहिल्याने आम्ही नीतिमत्ता, सहानुभूती, सचोटी, पारदर्शकता आणि उत्कृष्टतेच्या आमच्या मुख्य मूल्यासाठी समर्पित आहोत".इश्यूचे उद्दिष्ट हे नाना चिलोडा, अहमदाबाद येथे असलेल्या कंपनीच्या विद्यमान स्टोअरची खरेदी करणे हे आहे.

## लोकरंग

# साई द्वारकामाई फाउंडेशनचे पोलिसांना रक्षा कवच



अनेक सामाजिक संस्था या सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या जबाबदारीने अनेक सामाजिक उपक्रम राबवित असतात. साई द्वारकामाई फाउंडेशन हि देखील कॉर्पोरेट स्तरावर काम करणारी एक सामाजिक संस्था कार्यरत असून साई बाबांचा आदर्श डोळयासमोर ठेऊन त्यांच्याच दिव्य कृपा आणि आशीर्वादाने निरंतर सेवा प्रकल्प सातत्याने राबवित असतात. आनंदी राहा आणि आनंद वाटा या मूलमंत्राला आत्मसात करत साई द्वारकामाई फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून अलीकडेच रक्षा बंधनाच्या पावन पर्वाचे औचित्य साधून मुंबईतील कुलाबा,मरिन ड्राइव्ह,डी. बी . मार्ग,गावदेवी आणि वरळी येथील पोलीस अधिकाऱ्यांना रक्षा कवच बांधण्याचा नवोन्मेषी उपक्रम राबविला. आणि या सुरक्षा कवच उपक्रमाद्वारे जनतेच्या सुरक्षेसाठी राबणाऱ्या पोलिसांना एक प्रकारे त्यांच्या सुरक्षेचे बंधन बांधण्यात आले. हा उपक्रम साई द्वारकामाई फाउंडेशन चे डॉ . मिलिंद आर भट्ट यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आला. या पुढील काळात देखील बाबांच्या कृपाआशीर्वादाने असेच सामाजिक उपक्रम संस्था राबविणार आहे.

# बॉलीवूड फॅशनिस्टा अनन्या पांडेकडून ‘फॅशन अँड ग्लो अप’ अनुभव एअरबीएनबीवर



बॉलीवूड फॅशन आयकॉन अनन्या पांडे एक खास, अद्वितीय फॅशन आणि ग्लो अप अनुभव "अनन्याज स्टाईल एडिट", फक्त एअरबीएनबीवर आयोजित करण्यासाठी सज्ज आहे. फॅशनप्रेमी, ग्लॅमरचा शोध घेणाऱ्या आणि अनन्याच्या चाहत्यांना त्यांच्या सिग्नेचर स्टाइल विश्वात प्रवेश देण्यासाठी डिझाइन केलेला हा अनुभव जास्तीत जास्त चार पाहुण्यांना उपलब्ध असेल. दिल्लीतील सर्वात आकर्षक एअरबीएनबीपैकी एक असलेल्या अनन्याच्या स्वप्नातील क्लोसेट आणि व्हॅनिटी स्पेसच्या स्वप्नातीतल आवृत्तीत राहण्याची संधी चाहत्यांना मिळेल. तिच्या वॉकइन वॉर्डरोबपासून ते व्हॅनिटी झोनपर्यंत ही जागा पूर्णपणे धमाल फॅशन प्लेग्राउंडमध्ये रूपांतरित झाली आहे. अनन्यासोबत तिची एक्सपर्ट एटीम यात सहभागी होईल. ती चाहत्यांना फायनल ग्लोअप देईल. त्यांना तिच्या आवडत्या स्टायलिस्टकडून स्टाईल करून घेण्याची संधी मिळेल. तिच्या विश्वासू सौंदर्य टीमकडून ग्लॅमरस लुक मिळेल आणि आवडत्या फोटोग्राफरकडून फोटो काढले जातील. उत्तम ग्लो-अप, भलीमोठी फॅशन ऊर्जा आणि आपणच हिरो असल्याची भावना तुम्हाला उत्साहित करेल. ’मी एअरबीएनबी ओरिजिनल्सने तयार करून आयोजित केलेल्या “अनन्याज स्टाईल एडिट” द्वारे माझ्या ग्लिट्झ आणि ग्लॅमच्या जगात पाहुण्यांचे स्वागत करण्यास खूप उत्सुक आहे. फॅशन आणि अभिव्यक्ती हे एक अभिनेत्री म्हणून माझ्या व्यक्तिमत्त्वाचा एक मोठा भाग आहेत आणि माझ्या चाहत्यांना पर्सनल, प्रत्यक्ष पद्धतीने त्याची ओळख करून देणे ही खास गोष्ट आहे.’ असे सूत्रसंचालक अनन्या पांडे म्हणाली.

# शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्रचा आयपीओ बुधवारी उघडणार

शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १० रु. दर्शनीमूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १५५ रु. ते १६५ रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) बुधवार, १० सप्टेंबर २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ९० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ९० इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ पूर्णपणे २,४३,००,००० इक्विटी शेअर्सपर्यंतच्या शेअर्सचा एक नवीन इश्यू आहे ज्यामध्ये विक्रीसाठी कोणताही प्रस्ताव नाही.२००९ मध्ये स्थापन झालेले, शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र अमेरिकन हिरे, क्यूबिक झिरकोनिया, मोती, मोतीची आई आणि अर्ध-मौल्यवान दगड अशा विविध ‘स्टोन’नी सजवलेल्या मंगळसूत्रांच्या डिझाइन, उत्पादन आणि विपणनात गुंतलेले आहे, जे १८ कॅरेट आणि २२ कॅरेट सोन्यापासून बनवले जातात. कंपनी प्रामुख्याने तिच्या बिझनेस-टू-बिझनेस (B2B) क्लायंटना सेवा देते आणि कॅलेंडर वर्ष २३ पर्यंत भारतातील संघटित मंगळसूत्र बाजारपेठेचा अंदाजे ६ टक्के हिस्सा धारण करते, असे केअरएज अहवालात म्हटले आहे. शृंगार हाऊस ऑफ मंगळसूत्र भारतातील २४ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधील कॉर्पोरेट क्लायंट, घाऊक ज्वेलर्स आणि किरकोळ विक्रेत्यांसह विस्तृत श्रेणीतील ग्राहकांना सेवा देते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# हजारो घरे जमीनदोस्त, ढगफुटी, भूस्खलन हिमाचलमध्ये मान्सूनने घेतले 366 बळी

**शिमला, दि. ७ वृत्तसंस्था**

हिमाचल प्रदेश सरकारच्या महसूल विभागाच्या आपत्कालीन कामकाज केंद्राच्या एका अहवालानुसार, यंदा सुरू असलेल्या मान्सूनच्या हंगामात ३६६ लोकांचा मृत्यू झाला असून सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. २० जून ते ६ सप्टेंबर पर्यंतचा हा अहवाल राज्यातील मोठ्या प्रमाणावरील विध्वंसाची माहिती देतो.



मान्सूनच्या काळात एकूण ३६६ लोकांचा मृत्यू झाला, त्यापैकी २०३ जणांचा मृत्यू पावसाशी संबंधित घटनांमध्ये आणि १६३ जणांचा मृत्यू रस्ते अपघातांमुळे झाला. पावसाशी संबंधित मृत्यू वेगवेगळ्या कारणांमुळे झाले आहेत. ज्यामध्ये भूस्खलनामुळे ४२, बुडून ३४, अचानक आलेल्या पुरामुळे ९, ढगफुटीमुळे १७, झाडावरून किंवा उतारावरून पडून ४०, विजेच्या धक्क्याने १५, इतर कारणांमुळे २८, आगीमुळे ३ आणि सर्पदंशामुळे १५ लोकांचा मृत्यू झाला.

पावसाशी संबंधित मृत्यूंच्या जिल्हावार आकडेवारीनुसार, मंडीमध्ये सर्वाधिक ३७, त्यानंतर कांग्रा (३१), कुल्लू (२५), चंबा (२१), सिमला (२१), किन्नौर (१४), हमीरपूर (१३), बिलासपूर (११), उना (१०), सिरमौर (७), सोलन (७) आणि लाहौल आणि स्पिती (६) मृत्यू झाले. रस्ते अपघातातील एकूण १६३ मृत्यूंपैकी, चंबा आणि मंडी येथे प्रत्येकी २२, कांग्रा (१९), सोलन (१९), सिमला (१८), किन्नौर (१४), कुल्लू (१३), उना (१२), सिरमौर (११), बिलासपूर (७), हमीरपूर (३) आणि लाहौल आणि स्पिती (३) मृत्यूंचा समावेश आहे.

यंदा मान्सूनमुळे मालमत्ता आणि पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले असून, अंदाजे ४,०७,९०६.९० लाख रुपयांचे एकूण नुकसान झाले आहे, ज्यात सार्वजनिक मालमत्तेचे ४,००,००६.५० लाख आणि खासगी मालमत्तेचे ६,७००.४०५ लाख नुकसान झाले आहे. याव्यतिरिक्त, ३,३९० घरे आणि ४० झोपड्यांचे अंशतः नुकसान झाले, तर ६९२ पक्की घरे आणि ८३ कच्ची घरे पूर्णपणे नष्ट झाली. पशुधनाच्या नुकसानीत १,४६४ प्राण्यांचा आणि २६,९५५ कोंबड्यांचा मृत्यू झाला. राज्यात १३५ भूस्खलने, ९५ अचानक आलेले पूर आणि ४५ ढगफुटीच्या घटनांची नोंद झाली, ज्यात लाहौल आणि स्पिती (८३), मंडी (४६) आणि कुल्लू (४५) येथे सर्वाधिक घटना घडल्या.

# जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा राजीनामा देण्याच्या तयारीत

**टोक्यो, दि. ७ वृत्तसंस्था**

जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. जपानमधील त्यांच्या सत्ताधारी लिबरल डेमोक्रॅटिक पक्षात फूट पडू नये, म्हणून हा मोठा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे. जपानचं पब्लिक ब्रॉडकास्टर 'एनएचके'ने रविवारी हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. जुलैमध्ये झालेल्या निवडणुकीत इशिबा यांच्या एलडीपी नेतृत्वाखालील युतीने वरिष्ठ सभागृहात आपले बहुमत गमावले. या अपयशामुळे त्यांच्यावर मोठी टीका होत आहे.

६८ वर्षीय इशिबा यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्येच पंतप्रधान पदाचा भार स्वीकारला होता. अवघ्या वर्षभराच्या आताच त्यांच्यावर राजीनामा देण्याची वेळ आली आहे. एका वर्षाच्या आतच त्यांनी देशाच्या दोन्ही सभागृहात बहुमत गमावले आहे. गेल्या एका महिन्यापासून त्यांना त्यांच्याच पक्षाच्या उजव्या विचारसरणीच्या गटातून विरोध होत आहे. जुलैमध्ये, इशिबा यांच्या सत्ताधारी युतीला मोठा धक्का बसला होता. एका महत्त्वाच्या संसदीय निवडणुकीत २४८ जागांच्या वरिष्ठ सभागृहात बहुमत मिळवण्यात त्यांची युती अपयशी ठरली, ज्यामुळे त्यांच्या सरकारची स्थिरता आणखी कमकुवत झाली.

या निवडणुकीनंतर, पक्षाच्या खराब कामगिरीची जबाबदारी घेण्यासाठी इशिबा यांच्यावर दबाव वाढू लागला. आतापर्यंत इशिबा यांनी माघार घेण्यास नकार दिला होता. पण, आता त्यांनी हार मानल्याचे दिसत आहे. इशिबा यांच्या या निर्णयाची वेळ देखील खूप महत्त्वाची आहे. सोमवारी, त्यांचा लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष लवकरच नवीन नेतृत्वासाठी निवडणुका घ्यायच्या की नाही हे ठरवणार आहे. जर पक्षाच्या या अंतर्गत निवडणुकीत नवीन नेतृत्वाची मागणी मंजूर झाली असती, तर तो इशिबा यांच्याविरुद्ध एक प्रकारचा अविश्वास प्रस्ताव ठरला असता. मात्र, यापूर्वीच इशिबा खुर्ची सोडताना दिसत आहेत.

# लाल समुद्रात इंटरनेटची केबल तुटली

**नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था**

काल इंटरनेटचे स्पीड कमी झाल्याचे पाहायला मिळाले. याचे कारण आता समोर आले आहे. इंटरनेटचे स्पीड फक्त भारतातच नाही तर आशियातील पश्चिम आणि पूर्वेकडील इतर देशांतही कमी झाले. लाल समुद्रात समुद्राखालील केबल तुटल्यामुळे ही समस्या आली असल्याचे समोर आले. यामागील कारण अजूनही समोर आलेले नाही.

येमेनमधील हुथी बंडखोर या केबल्सना लक्ष्य करत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. बंडखोर हे गाझामधील हमासविरुद्धचे युद्ध संपवण्यासाठी इस्रायलवर दबाव आणण्याचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. हुथी बंडखोरांनी यापूर्वी अशा हल्ल्यांना नकार दिला आहे.

याचा परिणाम आता इंटरनेट कनेक्टिव्हीटीवर झाला आहे. याबाबत इंटरनेट ॲक्सेसवर लक्ष ठेवणारी संस्था नेटब्लॉक्सने म्हटले आहे की, लाल समुद्रात अनेक समुद्राखालील केबल्स कापल्यामुळे भारत आणि पाकिस्तानसह अनेक देशांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटीवर परिणाम झाला आहे. सौदी अरेबियातील जेद्दाह जवळील SMW4 आणि IMEWE केबल सिस्टीममध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ही समस्या दिसत आहे, असंही त्यांनी सांगितले.

दक्षिण पूर्व आशियामध्य पूर्वपश्चिम युरोप 4 (SMW4) केबल भारतीय कंपनी टाटा कम्युनिकेशन्सद्वारे चालवली जाते, ती एका मोठ्या भारतीय समुहाचा भाग आहे. इंडिया मध्य पूर्वपश्चिम युरोप (IMEWE) केबल दुसऱ्या कन्सोर्टियमद्वारे चालवली जाते, याचे निरीक्षण अल्काटेल-लुसेंट करते. दोन्ही कंपन्यांनी अद्याप या प्रकरणावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

सौदी अरेबियाने अद्याप इंटरनेट सेवांमध्ये व्यत्यय आल्याचे मान्य केलेले नाही आणि तेथील अधिकाऱ्यांनी टिप्पणीसाठी केलेल्या विनंत्यांना प्रतिसाद दिला नाही. संयुक्त अरब अमिरातीमध्ये, तिथे दुबई आणि अबू धाबी आहेत, देशातील सरकारी कंपन्यांच्या डू आणि एतिसलातच्या नेटवर्कवरील इंटरनेट वापरकर्त्यांनी इंटरनेटचे स्पीड कमी असल्याची तक्रार केली. सरकारनेही ही समस्या लगेच मान्य केली नाही.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**